- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४५,७०० /-
- २३ कॅरेट : १,४४,३५० /-
- चांदी : २,३२,३००/-

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
संपादक (विकास) : श्याम पेठकर   संचालक-संपादक : अजय बिवडे

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, ३० जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३१ | किंमत : २ रूपये

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# मध्य प्रदेशातील शेतकरी आक्रमक



**वृत्तसंस्था, भोपाळ**
महाराष्ट्राच्या शेजारील मध्य प्रदेश या राज्यात शेतकरी आक्रमक झाले आहेत. एमएसपी मूगाची १०० टक्के खरेदी करण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी राजधानी भोपाळमध्ये आंदोलन केले. नर्मदापूरम, हरदा, सीहोर, रायसेन आणि विदिशा यांसह १९ शेतकरी संघटनांतील हजारो शेतकऱ्यांनी पोलिसांनी उभारलेले बॅरिकेड्स तोडत भोपालमधील वीर सावरकर सेतू पार केला करत मुख्यमंत्र्यांच्या निवासाकडे जाण्याचा प्रयत्न केला.
या सर्व घडामोडींनंतर मुख्यमंत्री मोहन यादव यांनी आज सायंकाळी शेतकरी नेत्यांशी चर्चा करण्याचा निर्णय घेतला आहे.
आज २९ जुलै रोजी भोपाळमध्ये आंदोलक शेतकरी बसच्या छतावर चढून घोषणाबाजी करताना दिसले. यावेळी घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र आक्रमक शेतकऱ्यांपुढे पोलीस हतबल झाल्याचे पहायला मिळाले. राजधानीत निर्माण झालेल्या या तणावपूर्ण परिस्थितीनंतर मुख्यमंत्री मोहन यादव यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, आमचे सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. सकारात्मक सूचनांच्या माध्यमातून संवादातूनच समस्यांचे निराकरण करण्यावर आमचा भर आहे. सामान्य जनतेला कोणताही त्रास होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. सरकारने यासाठी विशेष समिती स्थापन केली असून ती शेतकरी बांधवांशी सातत्याने संवाद साधत आहे.

**शेतकरी आक्रमक का झाले?**
सरकारने निश्चित केलेल्या मूग खरेदीच्या मर्यादेविरोधात शेतकरी संतप्त झाले आहेत. एका एकरात सरासरी ४ ते ५ क्विंटल मूग उत्पादन होते. मात्र, सरकार टरढ वर केवळ १.२० क्विंटल मूगाचीच खरेदी करत आहेत. उर्वरित ३ ते ४ क्विंटल मूग शेतकऱ्यांना बाजारात केवळ ४,००० ते ५,५०० रुपये प्रति क्विंटल या कमी दराने विकावी लागत आहे. या आर्थिक नुकसानीमुळे आणि एमएसपीवर शंभर टक्के खरेदीच्या मागणीसाठी नर्मदापूरम येथून सुरू झालेला किसान मार्च आता राजधानीत पोहोचला आहे.


**कृषिमंत्र्यांनी घेतली शेतकरी प्रतिनिधींची भेट**
मंगळवारी उशिरा रात्री कृषिमंत्री एदल सिंह कंषाना यांनी भोपालमधील आपल्या कार्यालयात आंदोलन करणाऱ्या शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा केली. यानंतर त्यांनी सांगितले की शेतकऱ्यांच्या विशेष मागण्या, विशेषतः मूग खरेदीसंदर्भातील मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाली आहे. सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करेल. त्यानंतर कंषाना यांनी अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यास आणि मूग खरेदीसह इतर विषयांवर तातडीने आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिल्याची माहिती दिली आहे.

## थोडक्यात

### जपानला पुन्हा ६.८ रिश्टर तीव्रतेचा भूकंप

**टोकियो :** जपानच्या दक्षिणेकडील कुमामोटो प्रांत आज ६.८ रिश्टर एवढया मोठ्या भूकंपाने हादरला. भूकंपामुळे अनेक शहरांमधील इमारतींना हादरे बसले. काशिमा शहरातील एक शॉपिंग मॉल कोसळला. त्यात ५० पेक्षा जास्त लोक अडकल्याची भीती व्यक्त करण्यात आली असून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. अद्याप कोणत्याही प्राणहानीचे वृत्त नाही. भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा जारी करण्यात आला होता. मात्र, सुदैवाने त्सुनामी धडकली नाही. काही वेळाने इशारा मागे घेण्यात आला.
जपानच्या हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक वेळेनुसार सायंकाळी ४.२७ मिनिटांनी भूकंप झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली कुमामोटो शहराजवळ सुमारे १० किलोमीटर आत होता. केंद्रबिंदू टोक्योपासून सुमारे ९०० किलोमीटर अंतरावर आहे. दक्षिण जपानमधील अनेक ठिकाणी रस्ते, पूल तसेच इमारतांना तडे गेले. काही इमारतींमध्ये आग लागण्याच्या घटना घडल्या. भूकंपाचे हादरे बसताच बुलेट ट्रेनची सेवा तत्काळ थांबवण्यात आली. त्यामुळे अनेक स्थानकांवर प्रवाशांची गर्दी झाली. कुमामोटो शहराला जास्त फटका बसला. ऐतिहासिक कुमामोटो महालातील एका दगडी भिंतीचा काही भाग कोसळला. भूकंपानंतर सुमारे ६० सौम्य धक्के जाणवले. कुमामोटो शहरातील सुमारे ५० हजार घरांमधील वीजपुरवठा खंडित झाला होता.

# कोळसा घोटाळ्यात माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना क्लीन चिट



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
कोळसा घोटाळा प्रकरणात दिवंगत माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याविरोधातील समन्स सर्वोच्च न्यायालयाने अखेर रद्द केले आहे. विशेष न्यायालयाने डॉ. मनमोहन सिंग यांना आरोपी म्हणून बजावलेले समन्स रद्द करत सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयने सादर केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे. या निर्णयामुळे डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर सुमारे दोन वर्षांनी या प्रकरणात त्यांना कायदेशीररित्या पूर्णपणे क्लीन चिट मिळाली आहे.
हे प्रकरण ११ वर्षांहून अधिक कालावधीपूर्वीचे होते. कोळसा खाण वाटप प्रकरणात विशेष न्यायाधीशांनी डॉ. मनमोहन सिंग यांना आरोपी म्हणून समन्स बजावले होते. डॉ. मनमोहन सिंग २००४ ते २०१४ या काळात देशाचे पंतप्रधान होते आणि या कालावधीत कोळसा खाण वाटपाबाबत घेतलेल्या निर्णयांवरून अनेक तपास संस्थांकडून चौकशी झाली होती. मनमोहन सिंग यांनी २०१५ मध्ये विशेष सीबीआय न्यायालयाच्या समन्सला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. पहिल्याच सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने या समन्सवर स्थगिती आणत त्यांना मोठा दिलासा दिला होता. मात्र, हे प्रकरण दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने समन्सच्या वैधतेवर अंतिम निर्णय येऊ शकला नव्हता. दरम्यान, डिसेंबर २०२४ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन झाले.
सीबीआयने सखोल चौकशी केल्यानंतर या प्रकरणात क्लोजर रिपोर्ट दाखल केला होता. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या खंडपीठाने या प्रकरणी निर्णय दिला. सीबीआयचा क्लोजर रिपोर्ट फेटाळण्याचे किंवा मनमोहन सिंग यांच्याविरोधात दखल घेण्याचे कोणतेही ठोस कारण नव्हते. सीबीआयने दाखल केलेल्या दोन्ही क्लोजर रिपोर्टचे न्यायालयाने वरिष्ठ वकिलांच्या मदतीने अवलोकन केले आहे. न्यायालयाच्या प्रस्थापित निकषांनुसार सीबीआयचा तपास अहवाल स्वीकारणे योग्य असल्याचे नमूद करत खंडपीठाने निर्णय दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे डॉ. मनमोहन सिंग यांच्यावरील सर्व आरोप आता अधिकृतपणे संपुष्टात आले आहेत.

# पाकव्याप्त कश्मीरमध्ये गोळीबार, २० ठार



**वृत्तसंस्था, इस्लामाबाद**
पाकव्याप्त कश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला. निवडणुकीदरम्यान रावलकोटमध्ये निदर्शने करणाऱ्यांवर पाकिस्तानी सुरक्षा दलाने गोळीबार केला. त्यात २० लोकांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. यावरून सत्ताधारी पाकिस्तानी मुस्लीम लीग-नवाज (पीएमएल-एन) आणि पाकिस्तान पीपल्स पार्टीने (पीपीपी) एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले आहेत.
विधानसभा निवडणुकीदरम्यान सत्ताधाऱ्यांवर गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले होते. त्यातून मोठया प्रमाणात निदर्शने करण्यात आली. सरकारविरोधी निदर्शनांदरम्यान अनेक मतदान पेंद्रांवर चकमकी उडाल्या. जॉइंट अवामी ॲक्शन कमिटीच्या (जेएएसी) नेतृत्वाखाली रावळकोटच्या ईदगाह मैदानावर हजारो लोकांनी पाकिस्तान सरकार आणि तेथील सत्ता व्यवस्थेविरोधात मोर्चा काढून निदर्शने केली. जेएएसीने सरकारला मागण्यांबाबत २७ जुलैपर्यंत मुदत दिली होती. मात्र, मागण्या मान्य झाल्यानंतर लोकांनी मुझफ्फराबादच्या दिशेने मोर्चा काढला. त्यावर गोळीबार करण्यात आला. या घटनेनंतर रावळकोट आणि सुधनोती जिल्ह्यातील निवडणुका १० ऑगस्टपर्यंत पुढे ढकलल्या आहेत.

**निवडणुका अवैध, भारताकडून मान्यता नाही**
पाकव्याप्त कश्मीरमध्ये होत असलेल्या या निवडणुका भारताने अवैध असल्याचे म्हटले आहे. या निवडणुकांच्या माध्यमातून पाकिस्तान या भागातील अवैधरीत्या ताबा असलेला भाग लपविणे आणि तेथील मानवाधिकाराच्या उल्लंघनावरून जगाचे लक्ष हटवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप हिंदुस्थानने केला आहे. लोकांचे शोषण आणि सरकारच्या दडपशाहीमुळे पाकव्याप्त कश्मीरमध्ये निदर्शने होत असल्याचे परराष्ट्र प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले.

**निवडणुकीवर बहिष्कार**
पाकव्याप्त कश्मीरमधील विधानसभा निवडणुकीवर अनेक ठिकाणी बहिष्कार टाकण्यात आला आहे. धाडियाल येथील गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कूलमधील मतदान पेंद्रावर एकही मतदार पोहोचला नाही.

# लोकसभेत पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदा मंजूर, ७ वर्षांचा तुरुंगवास आणि १० कोटींच्या दंडाची तरतूद

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
लोकसभेने पेपरफुटीशी संबंधित 'सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६' आवाजी मतदानाने मंजूर केले. या विधेयकावर काल (२८ जुलै) नऊ तास चर्चा झाली. आज (२७ जुलै) राहुल गांधी यांनी विरोधी पक्षांच्या वतीने ५० मिनिटे भाषण केले. विरोधी पक्षांच्या गदारोळात हे विधेयक मंजूर झाले. यामुळे पेपरफुटीशी संबंधित कायदे अधिक कठोर झाले आहेत. आता, पेपरफुटीशी संबंधित गुन्ह्यांसाठी कमाल १० वर्षांचा तुरुंगवास आणि १० कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा आहे. दरम्यान, राज्यसभेने 'राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंधक (सुधारणा) विधेयक, २०२६' देखील मंजूर केले. 'जन गण मन' प्रमाणेच आता 'वंदे मातरम'ला कायदेशीर संरक्षण मिळेल. 'वंदे मातरम'चा अपमान करणे, अनादर करणे किंवा ते गाण्यात अडथळा आणणे हा शिक्षेस पात्र गुन्हा असेल. दुसरीकडे, विरोधी पक्षांच्या गदारोळात लोकसभेत कागदपत्रपत्रिका फुटीशी संबंधित सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आले. वंदे मातरमचा अपमान करणे हा शिक्षापात्र गुन्हा ठरवणारे विधेयक राज्यसभेने मंजूर केले. हा कायदा वंदे मातरमचा अपमान करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद करतो.




# १० हजार मीटर शर्यतीत भारताला पहिल्यांदाच रौप्य





**वृत्तसंस्था, ग्लासगो**
येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये हिंदुस्थानी खेळाडूंनी शानदार कामगिरीचे प्रदर्शन सुरूच ठेवले असून भारताचा स्टार धावपटू गुलवीर सिंग याने पुरुषांच्या १०,००० मीटर शर्यतीत रौप्यपदक जिंकून इतिहास रचला आहे. या प्रकारात पदक जिंकणारा तो पहिलाच भारतीय खेळाडू ठरला आहे. तर दुसरीकडे, भारोत्तोलनमध्ये हरजिंदर कौर हिनेही भारताच्या खात्यात आणखी एका रौप्यपदकाची भर घातली आहे.
आशियाई विजेता असलेल्या गुलवीर सिंगने स्कॉटस्टौन स्टेडियमवर २७ मिनिटे ४९.७८ सेकंदांची वेळ नोंदवत ऐतिहासिक रौप्यपदकावर आपले नाव कोरले. ऑस्ट्रेलियाच्या काय रोबिन्सनने या शर्यतीत सुवर्णपदक पटकावले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात पुरुषांच्या १०,००० मीटर शर्यतीत भारताला मिळालेले हे पहिलेच पदक आहे.
महिलांच्या ६९ किलो वजनगटात २९ वर्षीय भारोत्तोलक हरजिंदर कौरने एकंदरीत २२७ किलो वजन उचलत रौप्यपदकाला गवसणी घातली. ग्लासगोमधील वेटलिफ्टिंगमधील आठ स्पर्धांपैकी भारताचे हे सातवे पदक ठरले आहे. यापूर्वी २०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल स्पर्धेत हरजिंदरने कांस्यपदक जिंकले होते. गुलवीर आणि हरजिंदरच्या यशामुळे भारताच्या एकूण पदकांची संख्या आता १२ वर पोहोचली आहे. यामध्ये २ सुवर्ण, ७ रौप्य आणि ३ कांस्यपदकांचा समावेश आहे.

संपादकीय लेखणीतून...

## प्रश्नांवर एके-४७

बिहारमध्ये आंदोलक विद्यार्थ्यांवर एके-४७ रायफलीचा वापर करण्यात आल्याच्या आरोपांवरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सोमवारी मोदी सरकारला लक्ष्य केले. विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनावर हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील विद्यार्थ्यांची माफी मागावी, अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. सध्याचे केंद्र सरकार बेइमान असून सुधारणा करणे या सरकारच्या आवाक्याबाहेर आहे, असा आरोपही त्यांनी केला. राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर हिंदीमध्ये पोस्ट करत म्हटले की, संपूर्ण यंत्रणा विद्यार्थ्यांविरोधात जीवघेणी बनली आहे. जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलकांवर पॅलेट गनचा वापर आणि बिहारमधील आंदोलकांविरोधात एके-४७ रायफलमधून पोलिसाने केलेला गोळीबार या मुद्यावरून सोमवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच इंडिया आघाडीच्या नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना लक्ष्य केले. पॅलेट गन आणि एके-४७ वापरण्याचे आदेश कोणी दिले होते, हे विद्यार्थी म्हणजे दहशतवादी होते का? हा मुद्दा अत्यंत गंभीर असून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेच्या सभागृहामध्ये येऊन स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी काँग्रेससह इतर विरोधी पक्षांनी केली. देशभरातील स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी केंद्र सरकारने सोमवारी लोकसभेत परीक्षा सुधारणा विधेयक मांडले. मात्र, दिल्लीतील जंतरमंतर येथे पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस लाठीमाराच्या मुद्यावरून विरोधी पक्षांनी आक्रमक भूमिका घेत चर्चेची मागणी केली. विरोधकांची जोरदार घोषणाबाजी आणि गोंधळामुळे संसदेचे कामकाज वारंवार तहकूब करावे लागले. कामकाज तहकूब झाल्यानंतर विरोधी खासदारांनी संसद परिसरातही फलक हातात घेऊन निदर्शने केली. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत हे विधेयक मांडताच विरोधी पक्षाच्या खासदारांनी वेलमध्ये उतरून निदर्शने सुरू केली. राजीनाम्यानंतर सोमवारी संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सहभागी होण्यासाठी माजी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान हे संसदेत दाखल झाले, त्यावेळी भाजप खासदारांनी प्रधान यांचे जंगी स्वागत केले. खासदार संजय जयस्वाल यांनी त्यांचा शाल देऊन सत्कार केला. त्यांना एक टोपी भेट देण्यात आली आणि धर्मेंद्र प्रधान जिंदाबादच्या घोषणा देण्यात आल्या.

दिल्लीतील आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या अत्याचाराचे किंवा लाठीमाराचे समर्थन केले जाऊ शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट केले. शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार हा पूर्णपणे मूलभूत आणि घटनात्मक अधिकार आहे, असे न्यायालयाने अधोरेखित केले. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने नीट पेपरफुटीप्रकरणी निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस अत्याचाराविरोधातील याचिकांवर सुनावणी घेण्याचे मान्य केले आहे. आंदोलनादरम्यान जखमी झालेल्या काही पोलिस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी दाखल केलेल्या स्वतंत्र याचिकेवर इतर याचिकांसोबतच सुनावणी घेतली जाईल, असे खंडपीठाने स्पष्ट केले. शांततापूर्ण निदर्शने करण्याचा अधिकार पूर्णपणे अबाधित आहे. तो नाकारता येणार नाही. केवळ आंदोलन सुरू आहे म्हणून पोलिसांच्या अत्याचाराचे समर्थन होऊ शकत नाही, असे सरन्यायाधीश म्हणाले. २२ जुलै रोजी दिल्ली उच्च न्यायालयानेही २० जुलैच्या मार्चदरम्यान पोलिसांकडून झालेल्या अत्याचाराच्या आरोपांवर केंद्र सरकार आणि दिल्ली पोलिसांना नोटीस बजावली असून सर्व सीसीटीव्ही फुटेज आणि व्हीडीओ रेकॉर्डिंग सुरक्षित ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

आंदोलनात काही समाजकंटक घुसल्यास त्यावर योग्य कारवाई करता येऊ शकते. हा केवळ दिल्लीपुरता मर्यादित प्रश्न नसून देशात एकसमान नियमावलीची गरज आहे, असे खंडपीठाने नमूद केले. नीट पेपरफुटी प्रकरण केंद्र सरकारने नीट न हाताळल्यामुळे महिनाभरापासून विद्यार्थी जंतरमंतरवर आंदोलन करत होते. परंतु सरकारने सीजेपीच्या मागण्यांची गांभीर्याने दखल न घेता दडपशाही करण्याचा प्रयत्न केला. आंदोलनाची व्याप्ती देशभर पसरल्यामुळे अखेर सरकारचे डोळे उघडले आणि संसदेच्या पावसाळी अधिवेशनात शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. हेच जर का आधी केले असते, तर सरकारवर नामुष्कीची वेळ आली नसती. परंतु आम्ही कोणाचे ऐकणार नाही, हम करे सो कायदा या मनमानीला तरुणाईने प्रखर विरोध केला. त्यामुळे सरकार बॅकफूटवर गेले. विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही या आंदोलनाला बाहेरून पाठिंबा दिल्यामुळे सीजेपीला बळ मिळाले व त्यांच्या आंदोलनाची यशस्वी सांगता झाली. आता तरी विद्यमान भाजप नेते माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नैतिक व तत्त्वनिष्ठ राजकारणाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवतील का? झुरळांचे आंदोलन धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर थांबले. मात्र, या आंदोलनाचा अर्थ केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्यापुरता मर्यादित नाही. जेन-झीने व्यवस्थेला दिलेला हादरा हा एका प्रश्नापुरता नव्हता, त्यांनी व्यवस्थेच्या चिरेबंदी चाकोऱ्याच गदागदा हलवून सोडल्या. काही जणांनी २०१४च्या स्वातंत्र्योत्तर भारताचे असे चित्र रंगवले की, देश जणूकाही कायमचा अमृतकाळ अनुभवत आहे. प्रत्यक्षात मात्र समस्याही होत्या आणि त्या समस्यांशी झुंजणारे लोकही होते. फरक इतकाच की, गत काही वर्षांत प्रत्येक प्रश्नाला राष्ट्रवादाचे कवच चढवले गेले. त्यामुळे प्रश्न विचारणाऱ्यालाच संशयाच्या चौकटीत उभे केले जाऊ लागले. या कोंडीतून बाहेर पडण्याचा मार्ग या आंदोलनाने दाखवला. हीच त्याची सर्वांत मोठी उपलब्धी ठरली. नीटचा प्रश्न किंवा धर्मेंद्र प्रधान यांचा चेहरा ही केवळ निमित्ते होती.

या आंदोलनाने आणखी एक गोष्ट स्पष्ट केली की, आपल्या घरात वाढत असलेल्या जेन झी पिढीकडे आपण किती चुकीच्या नजरेने पाहत आलो आहोत! ज्यांना आपण बेफिकीर, बेजबाबदार म्हणून हिणवत होतो, त्याच पिढीने भारतीय लोकशाहीला नवी दिशा दाखवली, जिवंत ठेवली. त्यांनी स्वतःची भाषा शोधली, स्वतःची माध्यमे उभी केली आणि स्वतःची अभिव्यक्ती घडवली. मुख्य प्रवाहातील माध्यमांनी त्यांना दुर्लक्षित केले, तरी त्यांनी स्वतःचा मार्ग निर्माण केला. आंदोलनातील सर्वांत आश्वासक चित्र म्हणजे मुला-मुलींमधील परस्पर विश्वास. अनेक दिवस-रात्र ते एकत्र होते. पावसात भिजले, रस्त्यावर झोपले, पण एकाही मुलीला असुरक्षित वाटल्याचे चित्र दिसले नाही. त्या ज्या आत्मविश्वासाने आंदोलनात वावरल्या, तशा कदाचित स्वतःच्या घरातही वावरल्या नसतील. ज्यांनी लाठीमार केला, त्याच पोलिसांना पिज्झा ऑफर करणारी ही मुले कोणत्या संस्कारातून आली आहेत याचाही विचार व्हायला हवा.

# भारतीय संस्कृतीचे प्राणतत्त्व म्हणजे गुरू-शिष्य परंपरेचा समृद्ध प्रवास

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय संस्कृती, इतिहास आणि अध्यात्माचा विचार केला, तर त्यामागील सर्वात भक्कम आणि दैदिप्यमान पाया म्हणजे 'गुरू-शिष्य परंपरा' होय. आपल्या परंपरेत गुरूला केवळ भौतिक जगाची माहिती देणारा किंवा अक्षरांचे व शास्त्रांचे ज्ञान देणारा एक शिक्षक मानले गेलेले नाही, तर शिष्याच्या आत्म्याचा उद्धार करणारे, त्याला अज्ञानाच्या अंधाराकडून आत्मज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारे एक सर्वोच्च आणि अमूर्त 'तत्त्व' मानले गेले आहे. वास्तव पाहता, 'गुरू' या शब्दातील 'गु' म्हणजे अंधःकार आणि 'रु' म्हणजे प्रकाश, म्हणजेच जो शिष्याच्या मनातील भ्रम आणि अंधार दूर करून त्याला सत्याचा मार्ग दाखवतो, तोच गुरू होय.

"तमासो मा ज्योतिर्गमय" या उपनिषदांमधील महावाक्याचा खरा अर्थ प्रत्यक्षात आणण्याचे काम गुरुशिष्य परंपरेने युगायुगांपासून केले आहे. म्हणूनच भारतीय तत्त्वज्ञानात गुरूला ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिदेवांच्या वरचे स्थान देऊन थेट 'परब्रह्म' मानले गेले आहे, कारण ईश्वराची ओळख करून देणारे माध्यमही शेवटी गुरूच असतात. भारतीय इतिहासाच्या पानांवर डोकावून पाहिले तर पौराणिक महाकाव्यांचा कालखंड, महाराष्ट्राची समृद्ध संत परंपरा आणि ऐतिहासिक-आधुनिक काळ अशा तिन्ही कालखंडांत या परंपरेने मानवी मूल्यांची आणि राष्ट्राची उभारणी केल्याचे दिसून येते.

पौराणिक आणि महाकाव्य कालखंडात गुरू-शिष्याचे नाते हे पराक्रम, नीती आणि अध्यात्माचा त्रिवेणी संगम होते. याचे सर्वात उत्तम उदाहरण म्हणजे प्रभू रामचंद्र आणि त्यांचे बंधू. त्यांना राजधर्म, जीवनमूल्ये आणि अध्यात्माचे परमज्ञान महर्षी वसिष्ठांनी दिले, तर विश्वाच्या कल्याणासाठी आवश्यक असणारी अस्त्रविद्या आणि शौयार्चे धडे महर्षी विश्वामित्रांनी दिले. ईश्वरी अवतार असूनही मानवी रूपात गुरूपदाचे श्रेष्ठत्व मान्य करून आश्रमात राहण्याची ही रीत थक्क करणारी आहे. याचप्रमाणे, भगवान श्रीकृष्ण आणि त्यांचे बंधू बलराम यांनी उज्जैन येथील ऋषी सांदिपनी यांच्या आश्रमात राहून अवघ्या ६४ दिवसांत ६४ कला आणि १४ विद्यांचे ज्ञान आत्मसात केले. हा इतिहास शिष्याची कुशाग्र बुद्धिमत्ता आणि गुरूच्या ज्ञानकौशल्याची साक्ष देतो.

महाभारत काळात आचार्य द्रोणाचार्य आणि अर्जुन यांची जोडी धनुर्विद्येतील श्रेष्ठतेचे जागतिक प्रतीक बनली. द्रोणाचार्यांच्या कठोर मार्गदर्शनाला सामोरे जात अर्जुन जगातील सर्वश्रेष्ठ धनुर्धर बनू शकला. मात्र, याच कालखंडात प्रत्यक्ष शिक्षणाची संधी नाकारली गेल्यानंतरही, केवळ गुरूच्या प्रतिमेला समोर ठेवून, अढळ निष्ठेच्या आणि स्व-साधनेच्या जोरावर धनुर्विद्येत प्राविण्य मिळवणारा एकलव्य हा शिष्याच्या समर्पणाचे अजरामर आणि सर्वोच्च प्रतीक बनला. याशिवाय, भगवान परशुराम यांनी आपल्या अत्यंत कडक शिस्तीत आणि तपोबलाने भीष्म पितामह, द्रोणाचार्य आणि कर्ण या तिघांनाही महाभयंकर अस्त्रविद्येचे दान दिले, ज्याने महाभारत काळातील युद्धाची दिशा ठरवली.

महाराष्ट्राच्या पावन भूमीत तर गुरूला थेट ईश्वराच्याही वरचे स्थान दिले गेले आहे. वारकरी आणि दत्त संप्रदायात गुरू हाच विठ्ठल आणि गुरू हाच परब्रह्म मानला गेला. या संत परंपरेची सुरुवातच गहिनीनाथ म्हणजेच गैनीनाथ आणि संत निवृत्तीनाथ यांच्या नात्यातून होते. नाथ संप्रदायाची ही ज्ञानसाखळी पुढे वारकरी पंथाचा पाया ठरली. संत निवृत्तीनाथ हे केवळ संत ज्ञानेश्वर माउलींचे मोठे बंधू नव्हते, तर ते त्यांचे आध्यात्मिक गुरू होते. गुरू निवृत्तीनाथांच्या केवळ एका आज्ञेवरून माउलींनी 'भावार्थदीपिका' अर्थात 'ज्ञानेश्वरी' सारख्या अलौकिक ग्रंथाची रचना करून प्राकृत भाषेत ज्ञानाचा सागर खुला केला. गुरू हे एखाद्या कुंभारासारखे असतात, जे शिष्याच्या दोषांवर कठोर प्रहार करत असतानाच आतून त्याला प्रेमाचा आणि मायेचा आधार देऊन एका उत्तम व्यक्तिमत्त्वात घडवत असतात. संत कबीर यांनी गुरू आणि शिष्याच्या नात्याला कुंभाराची अतिशय सुंदर उपमा दिली आहे,

'गुरू कुंभार शिष कुंभ है, गढि गढि काढै खोट।
भीतर हाथ सँवारि दै, बाहर मारै चोट॥'

म्हणजेच, गुरू हे एखाद्या निष्णात कुंभारासारखे असतात. ज्याप्रमाणे कुंभार मातीच्या माठाला सुंदर आकार देण्यासाठी वरून हाताने कठोरपणे थापट मारतो, पण त्याच वेळी आतल्या बाजूने दुसरा हात ठेवून अत्यंत हळुवारपणे मायेचा आधार देतो; अगदी तसेच गुरूंचेही असते. ते शिष्याच्या जीवनाला योग्य वळण लावण्यासाठी, त्याच्यातील दुर्गुण आणि चुकांवर शिस्तीचे कठोर प्रहार करतात. मात्र, या कठोरतेच्या मागे केवळ आणि केवळ शिष्याबद्दलचे अपार प्रेम, काळजी आणि त्याला एक उत्तम, परिपक्व व्यक्ती बनवण्याचा ध्यास असतो. गुरूंच्या या कठोर बाह्य शिस्तीत आणि आंतरिक मायेच्या कुशीतच खऱ्या अर्थाने एका आदर्श शिष्याचे आणि उत्तम व्यक्तिमत्त्वाचे निर्माण होते.

या परंपरेत शिष्याची गुरूचरणी असणारी अथांग निष्ठा इतकी टोकाची होती की, संत एकनाथ महाराजांनी आपल्या अस्तित्वाचा अहंभाव पूर्णपणे पुसून टाकला. ते आपल्या प्रत्येक अभंगाच्या शेवटी स्वतःचे नाव 'एका जनार्दनी' असे लावून आपले गुरू स्वामी जनार्दन यांच्या चरणी लीन होतात. तसेच, संत नामदेव महाराजांचे विठ्ठलावर अथांग प्रेम होते, पण त्यांचा हा भाव सगुण भक्तीपुरता मर्यादित होता. त्यांना सर्वव्यापी, निर्गुण ईश्वराचे दर्शन घडवून त्यांचा अहंकार नष्ट करण्याचे महान कार्य त्यांचे गुरू संत विसोबा खेचर यांनी केले. संत तुकाराम महाराजांना तर कोणत्याही भौतिक आश्रमाची पायरी न चढता, स्वप्नात बाबाजी चैतन्य यांनी 'राम कृष्ण हरी' हा अत्यंत सोपा पण प्रभावी गुरुमंत्र दिला. संत चोखामेळा यांनी ज्ञानेश्वर माउलींना आपले मानसगुरू मानून समतेची भक्ती केली, तर अक्कलकोटचे स्वामी समर्थ आणि दत्त परंपरेत गुरुतत्त्वालाच साक्षात ईश्वर मानून शरणागती पत्करली जाते.

गुरू-शिष्य परंपरा केवळ मंदिरांपुरती किंवा आश्रमांपुरती मर्यादित नव्हती, तर तिने भारताचा राजकीय आणि सामाजिक इतिहास बदलून टाकला. याचे सर्वात दैदिप्यमान उदाहरण म्हणजे आचार्य चाणक्य (कौटिल्य) आणि चंद्रगुप्त मौर्य. एका सामान्य, गरीब मुलाला आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या, कूटनीतीच्या आणि शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणाने अखंड भारताचा सम्राट बनवणारे चाणक्य आणि गुरूच्या शब्दाला अंतिम प्रमाण मानणारा त्यांचा आज्ञाधारक शिष्य चंद्रगुप्त ही राजकारणातील व राष्ट्रउभारणीतील सर्वश्रेष्ठ जोडी आहे.

हाच वारसा पुढे मध्ययुगीन काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने पाहायला मिळतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील पहिल्या गुरू आणि मार्गदर्शक त्यांच्या माता राजमाता जिजाऊ आणि दादोजी कोंडदेव या होत्या, ज्यांनी शिवरायांच्या मनात स्वराज्याचे आणि नीतीचे बीज रोवले. पुढे हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना शिवरायांना समर्थ रामदास स्वामींचे आध्यात्मिक-सामाजिक मार्गदर्शन आणि संत तुकाराम महाराजांचे आशीर्वाद लाभले, ज्यामुळे स्वराज्याच्या तलवारीला भक्ती आणि शक्तीचे अधिष्ठान प्राप्त झाले.

आधुनिक काळाचा विचार केल्यास, स्वामी रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद ही जोडी संपूर्ण विश्वासाठी एक दिव्य प्रकाश ठरली. रामकृष्ण परमहंसांच्या आध्यात्मिक अनुभूतीने आणि अथांग प्रेमाने नरेंद्र नावाच्या एका तार्किक, शंकाकुशंका घेणाऱ्या तरुणाचे रूपांतर 'स्वामी विवेकानंद' या जगज्जेत्या संन्याशामध्ये केले. विवेकानंदांनी आपल्या गुरूंच्या नावावर 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना करून आणि शिकागो येथील जागतिक धर्मपरिषदेत भारतीय संस्कृतीचा, वेदांताचा डंका वाजवून संपूर्ण जगाला मानवतेचा संदेश दिला.

आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात माहितीचा महापूर आलेला आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे ज्ञान मिळवणे सोपे झाले असले, तरी 'माहिती' आणि 'विवेक' यातील सूक्ष्म फरक स्पष्ट करण्यासाठी गुरूची आवश्यकता आजही तितकीच, किंबहुना जास्त आहे. गुगल आपल्याला एका क्लिकवर जगाची कोणतीही माहिती देऊ शकते, परंतु जीवन जगण्याचा योग्य दृष्टिकोन, संस्कार, आणि आंतरिक शांती केवळ एका खऱ्या गुरूच्या जिवंत मार्गदर्शनातूनच मिळू शकते. माहितीचे रूपांतर जीवनाला दिशा देणाऱ्या ज्ञानात करण्याचे सामर्थ्य फक्त गुरुतत्त्वामध्येच असते.

या सर्व कालखंडांतील आदर्श जोड्यांकडे पाहिल्यावर एक महत्त्वाचा संदेश मिळतो, तो म्हणजे ही परंपरा केवळ पुस्तकी ज्ञानाची नसून ती एका आत्मिक अनुभूतीची आणि अखंड समर्पणाची आहे. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेत शिष्याकडेही विनम्रता, जिज्ञासा आणि अहंकारशून्य वृत्ती असणे अत्यंत आवश्यक आहे, कारण रिकाम्या पात्रातच ज्ञानाचे अमृत टिकू शकते. एकलव्याचे समर्पण, अजुर्नाची एकाग्रता, ज्ञानेश्वरांची आज्ञाधारकता आणि विवेकानंदांची गुरुभक्ती या गोष्टी हेच सिद्ध करतात की, आदर्श शिष्याशिवाय गुरूचे ज्ञान फळाला येऊ शकत नाही. गुरू-तत्त्व हे मानवी जीवनाला पशुत्वाकडून देवत्वाकडे नेणारा एक दैवी प्रकाशमार्ग आहे, जो पिढ्यानपिढ्या मानवी कल्याणासाठी मार्गदर्शक ठरत आला आहे आणि भविष्यातही राहील.

- ९५६१५९४३०६

# श्रीलंका दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघ जाहीरः युवा जोश अन् अनुभवाचा मेळ; बुमराहवर असणार सर्वांची नजर

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

आगामी श्रीलंका दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघाची घोषणा करण्यात आली असून, निवड समितीने अनुभवी दिग्गज, फॉर्ममध्ये असलेले तरुण फलंदाज आणि प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा एक उत्तम मेळ साधला आहे. वॉशिंग्टन सुंदर आणि नितीश रेड्डी दुखापतींमुळे बाहेर पडल्याने काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळाली आहे.

शुभमन गिलच्या खांद्यावर संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली असून, अनुभवी केएल राहुल उपकर्णधार म्हणून त्याची साथ देणार आहे. या संपूर्ण १५ सदस्यीय संघाचे सखोल विश्लेषण खालीलप्रमाणेः -

**१. फलंदाजीची भक्कम फळी**

शुभमन गिल (कर्णधार): (४१ सामने, २,९६९+ धावा, सरासरीः ४३.६६) - गाबा कसोटीतील ९१ धावांची ऐतिहासिक खेळी असो किंवा आशियाई वातावरणात फिरकीविरुद्धचे नियंत्रण असो, कर्णधार गिल हा या संघाच्या फलंदाजीचा मुख्य स्तंभ आहे.

केएल राहुल (उपकर्णधार): (५०+ सामने, ३,०००+ धावा, ८ शतकं) - परदेशी आणि आशियाई अशा दोन्ही परिस्थितींत सलामीला तसेच मधल्या फळीत फलंदाजीचा प्रदीर्घ अनुभव असलेला राहुल उपकर्णधार म्हणून मुख्य मार्गदर्शक असेल.

यशस्वी जयस्वालः (२९ सामने, २,५३५ धावा, ५०+ सरासरी) झ्र अत्यंत आक्रमक आणि सातत्यपूर्ण डावखुरा फलंदाज. इंग्लंडविरुद्ध मायदेशात ठोकलेली सलग दोन द्विशतके आणि परदेशातील कामगिरीमुळे तो जागतिक क्रिकेटमधील सर्वात घातक सलामीवीरांपैकी एक आहे.

साई सुदर्शन (फिटनेसच्या अधीन): (७ सामने, ३८३ धावा : ४२ सामने, ३,०००+ धावा, १० शतकं) झ्र तंत्रशुद्ध आणि संयमी फलंदाजीसाठी ओळखला जाणारा हा तरुण फलंदाज मिडल ऑर्डर मजबूत करतो.

देवदत्त पडिक्कलः (२ सामने, ९० धावा : ५४ सामने, ३,६२७ धावा, ९ शतकं) - इंग्लंडविरुद्धच्या कसोटी पदार्पणात अर्धशतक ठोकणारा पडिक्कल उत्तम फॉर्ममध्ये असून 'इंडिया अ'च्या श्रीलंका दौऱ्यातही त्याने ९४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली होती.

**२. यष्टिरक्षक-फलंदाज**

रिषभ पंतः (५० सामने, ३,५५७ धावा, ६ शतकं) - भारताचा सर्वात मोठा मॅच-विनर. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड



आणि दक्षिणेस आफ्रिकेत कसोटी शतकं ठोकणारा तो एकमेव आशियाई यष्टिरक्षक आहे.

ध्रुव जुरेलः (१० सामने, ४७८ धावा, १ शतक) झ्र इंग्लंडविरुद्धच्या 'रांची कसोटी'त दबावाखाली खेळलेली ९० धावांची खेळी आजही स्मरणात आहे. यष्टिरक्षणात चपळ आणि कठीण प्रसंगात मधल्या फळीला सावरणारा भरवशाचा खेळाडू.

**३. फिरकीचा तगडा ताफा व अष्टपैलू**

रवींद्र जडेजाः (८९ सामने, ४,०९५ धावा, ३४८ बळी) - जगातील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू. श्रीलंकेच्या खेळपट्ट्यांवर त्याची घातक गोलंदाजी आणि सातत्यपूर्ण फलंदाजी भारताचे सर्वात मोठे शस्त्र ठरेल.

कुलदीप यादवः (१७ सामने, ७६ बळी, ५-बळीः ५ वेळा) - चायनामन (डावखुरा मनगटी) गोलंदाज. उपखंडातील वळण घेणाऱ्या खेळपट्ट्यांवर तो प्रतिस्पर्धी फलंदाजांना कोड्यात पाडतो.

मानव सुथारः (१ सामना, ७ बळी, प्रथम श्रेणी -३२ सामने, १४७ बळी) - डावखुरा ऑर्थोडॉक्स स्पिनर. अफगाणिस्तानविरुद्ध पदार्पणातच ६/३३ अशी ऐतिहासिक गोलंदाजी करून त्याने संघात स्थान पक्के केले.

सारांश जैन (नवा चेहरा): ( प्रथम श्रेणीः ५४ सामने, १८८ बळी, २,२२३ धावा) - वॉशिंग्टन सुंदर दुखापतग्रस्त असल्याने मध्य प्रदेशच्या या अनुभवी ऑफ-स्पिनरला प्रथमच संधी मिळाली आहे. 'इंडिया अ' श्रीलंका दौऱ्यात ६ बळी व नाबाद ७० धावांची कामगिरी त्याच्या निवडीचे कारण ठरली.

**४. वेगवान गोलंदाजीची फळी (विशेष आकर्षणः बुमराह)**

जसप्रीत बुमराह (फिटनेसच्या अधीन): (५२ सामने, २५२ बळी, सरासरीः २०.२९) भारताबाहेर आशियात पहिलीच कसोटी! अवघ्या २०.२९ च्या सरासरीने २५२ बळी टिपणाऱ्या बुमराहबाबत एक अतिशय अनोखी बाब म्हणजे—भारत सोडल्यास आशिया खंडातील (श्रीलंका, बांगलादेश, पाकिस्तान) त्याची ही पहिलीच कसोटी मालिका असेल. सेना देशांत धुमाकूळ घातल्यानंतर, आता श्रीलंकेत जुन्या चेंडूने 'रिव्हर्स स्विंग'चा वापर करत बुमराह कशी कमाल करतो, याकडे जगाचे लक्ष असेल.

**भारताबाहेर आशियात पहिलीच कसोटी!**

अवघ्या २०.२९ च्या सरासरीने २५२ बळी टिपणाऱ्या बुमराहबाबत एक अतिशय अनोखी बाब म्हणजे—भारत सोडल्यास आशिया खंडातील (श्रीलंका, बांगलादेश, पाकिस्तान) त्याची ही पहिलीच कसोटी मालिका असेल. सेना देशांत धुमाकूळ घातल्यानंतर, आता श्रीलंकेत जुन्या चेंडूने 'रिव्हर्स स्विंग'चा वापर करत बुमराह कशी कमाल करतो, याकडे जगाचे लक्ष असेल.

मोहम्मद सिराजः (४६ सामने, १४० बळी) - नव्या चेंडूने आक्रमक मारा करणारा आणि सतत स्टंप्सच्या लाईनमध्ये गोलंदाजी करणारा गोलंदाज.

प्रसिद्ध कृष्णाः (७ सामने, २५ बळी) - उंच बांधा, जास्त बाउंस आणि चांगला वेग यामुळे तो आशियाई खेळपट्ट्यांवरही प्रभावी ठरू शकतो.

गुरनूर ब्रारः (१ सामना, २ बळी - ५२ बळी) - ६ फूट ५ इंच उंची असलेला पंजाबचा तरुण गोलंदाज. उंचीमुळे मिळणारा अवांतर बाउंस आणि ताशी १४० किमी पेक्षा जास्त वेग ही त्याची वैशिष्ट्ये आहेत.

**निर्णायक दौरा**

श्रीलंकेतील फिरकीला अनुकूल परिस्थिती पाहता जडेजा, कुलदीप, मानव आणि सारांश ही फिरकीची चतुःसूत्री, आशियातील परदेशी भूमीवर पहिल्यांदाच कसोटी खेळणाऱ्या बुमराहचे २५२ बळींचे कौशल्य, आणि अनुभवी-युवा फलंदाजांचा भरणा यामुळे या मालिकेत भारतीय संघाचे पारडे निश्चितच जड मानले जात आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# ३५ वर्षांनंतरही विकासाची प्रतीक्षा !

## 'सोन्याचे कवाड' असलेले मोवाड आजही मूलभूत सुविधांसाठी वंचित, महापुराच्या जखमा अजूनही ताज्याच; शिक्षण, आरोग्य, रोजगार, पाणी आणि रस्त्यांच्या प्रश्नांनी नागरिक त्रस्त

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**



३० जुलै १९९१... मोवाड शहरासाठी आजही अंगावर शहारे आणणारी ती काळरात्र! भीषण महापुराने अवघ्या काही तासांत होत्याचे नव्हते केले. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले, तर अनेकांना आपले जीव गमवावे लागले. त्या महाप्रलयाला आज तब्बल ३५ वर्षे पूर्ण होत असतानाही मोवाड शहर विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूरच असल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहेत.

महापुरानंतर गावाचे पुनर्वसन झाले. पूर्वी सुमारे ५० एकरांमध्ये वसलेले शहर आता सुमारे ४०० एकरांमध्ये विस्तारले. मात्र विस्तार झाला, विकास नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रत्येक निवडणुकीत आश्वासनांची आतषबाजी होते; मात्र निवडणूक संपताच ती आश्वासने हवेत विरतात, अशी भावना नागरिकांमध्ये आहे.

शहरातील प्रमुख रस्ते आजही खड्डेमय आहेत. अनेक प्रभागांमध्ये पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य निर्माण होते. सांडपाणी व्यवस्थापन अपुरे असून अनेक ठिकाणी नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने नागरिकांना दुर्गंधी व डासांचा त्रास सहन करावा लागतो.

नगर परिषदेची इमारत पूर्णपणे जीर्ण झाली असून दरवर्षी किरकोळ दुरुस्तीवर लाखो रुपये खर्च होतात. मात्र नवीन प्रशासकीय इमारतीचा प्रस्ताव अद्यापही मार्गी लागलेला नाही. शहरातील इतर अनेक शासकीय इमारतींचीही अवस्था बिकट झाली आहे.

एकेकाळी शिक्षणासाठी नावाजलेले मोवाड आज विद्यार्थ्यांच्या अभावाने झगडत आहे. आधुनिक शिक्षणाच्या युगात शहरात एम.ए., बी.कॉम.पर्यंतचे शिक्षण उपलब्ध नाही. बारावी विज्ञान शाखेचीही सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना नागपूर, काटोल, नरखेड, वर्धा किंवा अमरावतीकडे धाव घ्यावी लागते. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांवर याचा आर्थिक ताण पडत आहे.

एकेकाळची गजबजलेली बाजारपेठ आज ओस पडली आहे. रोजगाराच्या संधी नसल्याने युवक मोठ्या शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. परिणामी स्थानिक व्यापारावर मोठा परिणाम झाला असून अनेक व्यावसायिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

नागपूर जिल्ह्यातील प्रमुख संत्रा पट्टा म्हणून मोवाड परिसराची ओळख आहे. मात्र संत्रा प्रक्रिया उद्योगाचा अभाव, साठवणूक सुविधा नसणे, निर्यात साखळी विकसित न होणे आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत आहेत. कृषी प्रक्रिया उद्योग उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.

शहरात दररोज सुमारे १३ लाख लिटर पाणीपुरवठा केला जात असला, तरी १३०० ते १५०० फूट खोल बोअरवेलमधील पाणी नागरिकांच्या वाट्याला येते. पाण्याच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत असून किडनी स्टोनसह विविध आजार वाढत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. कायमस्वरूपी शुद्ध पाणी योजनेची मागणी पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे.

### आरोग्य सुविधा अपुऱ्या; रुग्णांची परवड

मोवाडसारख्या मोठ्या शहरात अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध नाहीत. गंभीर रुग्णांना नागपूर, वर्धा किंवा अमरावती येथे उपचारासाठी न्यावे लागते. सुमारे १०० किलोमीटरचा प्रवास करताना अनेकदा रुग्णांची प्रकृती अधिक गंभीर होते. उपजिल्हा रुग्णालय किंवा सुसज्ज ग्रामीण रुग्णालयाची मागणी वर्षानुवर्षे प्रलंबित आहे.

### पर्यटन विकासाचे आश्वासन हवेतच?

महापुरात वाहून गेलेल्या जुन्या मोवाडचे पर्यटनस्थळ म्हणून संवर्धन करण्याचे आश्वासन विधानसभा निवडणुकीत देण्यात आले होते. आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या कार्यकाळाला जवळपास २० महिने पूर्ण होत असतानाही या प्रकल्पाबाबत कोणतीही ठोस हालचाल दिसून आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



### नवीन नगरपरिषदेकडून मोठ्या अपेक्षा

सुमारे ७० महिन्यांच्या प्रशासकीय राजवटीनंतर मोवाडला लोकनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवक मिळाले. त्यांना निवडून येऊन सात महिने पूर्ण झाले असले, तरी शहरातील मूलभूत प्रश्न कायम आहेत. नागरिकांनी नव्या नेतृत्वाकडून रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, बाजार समिती, उद्याने, युवकांसाठी रोजगार व उद्योग अशा विविध क्षेत्रांत ठोस विकासाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

### हे प्रश्नही तातडीने सोडविण्याची गरज

शहरासाठी स्वतंत्र औद्योगिक वसाहतीचा अभाव. बसस्थानक व अंतर्गत वाहतूक सुविधांचे आधुनिकीकरण आवश्यक. युवकांसाठी कौशल्य विकास व रोजगार प्रशिक्षण केंद्राची गरज. महिलांसाठी स्वतंत्र व्यवसाय संकुल व बचतगटांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची मागणी. शहरात क्रीडा संकुल, सार्वजनिक वाचनालय आणि सांस्कृतिक भवनाची आवश्यकता. महापुराच्या इतिहासाचे जतन करणारे स्मृती संग्रहालय उभारण्याची मागणी. डिजिटल सुविधा, सीसीटीव्ही यंत्रणा आणि स्मार्ट सिटीच्या धर्तीवर मूलभूत नागरी सुविधा विकसित करण्याची गरज.

### आज श्रद्धांजली कार्यक्रम

महापुरातील मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी गुरुवारी (३० जुलै) सकाळी ९ वाजता नगर परिषद कार्यालय परिसरातील स्मारक येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार चरणसिंग ठाकूर राहणार असून खासदार शामकुमार बर्वे, विधानपरिषदेचे आमदार कृपाल तुमाने, आमदार डॉ. राजीव पोतदार, जिल्हा नियोजन समिती सदस्य राजू हरणे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष नरेश अरसडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

३५ वर्षांपूर्वीच्या महापुराने मोवाडचे अस्तित्व हिरावून घेतले; आता विकासाच्या अभावामुळे शहराची ओळखच धूसर होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. शासन आणि लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासने न देता मोवाडच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस कृती आराखडा राबविण्याची वेळ आता आली आहे.

---

थोडक्यात

## कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यू झालेल्या एसटी कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला न्याय द्या!

### महाराष्ट्र शेतकरी संघटनेची शासन व एसटी प्रशासनाकडे ठाम मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शेतकरी संघटनेने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या तुमसर आगारातील वाहतूक नियंत्रक स्व. श्री. रविंद्र गंगाधर मोहने यांच्या कोविड-१९ काळात कर्तव्य बजावताना झालेल्या मृत्यूप्रकरणी त्यांच्या कुटुंबाला तातडीने न्याय देण्याची मागणी केली आहे. संघटनेचे राज्याध्यक्ष व राष्ट्रीय प्रवक्ते भूषण कुटे यांनी विभाग नियंत्रक, भंडारा विभाग यांना सविस्तर निवेदन सादर करून कोविड-१९ काळात जनसेवा बजावताना प्राण गमावलेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला विमाकवच व सानुग्रह सहाय्य नाकारणे हा अन्यायकारक निर्णय असल्याचे म्हटले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्व. रविंद्र मोहने यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत कर्तव्य बजावत असताना कोविड-१९ ची लागण होऊन दिनांक २६ एप्रिल २०२१ रोजी त्यांचे निधन झाले. मात्र, उपचार घेतलेल्या रुग्णालयाला भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेची मान्यता नसल्याचे कारण पुढे करून त्यांच्या कुटुंबाला विमाकवच व सानुग्रह सहाय्य नाकारण्यात आले. संघटनेच्या मते हा निर्णय मानवी मूल्ये, सामाजिक न्याय आणि भारतीय राज्यघटनेतील समानता व सन्मानाने जगण्याच्या मूलभूत अधिकारांच्या विरोधात आहे.

महाराष्ट्र शेतकरी संघटनेने स्पष्ट केले आहे की, स्व. रविंद्र मोहने हे गरीब शेतकरी कुटुंबातील होते. त्यांच्या निधनानंतर कुटुंब आर्थिक व मानसिक संकटात सापडले असून, अशा परिस्थितीत तांत्रिक कारणांचा आधार घेत मदत नाकारणे हे कल्याणकारी राज्याच्या तत्त्वांना धरून नाही. कोविड महामारीच्या काळात उपलब्धतेनुसार रुग्णांना जवळच्या रुग्णालयात उपचार घ्यावे लागत होते. त्यामुळे केवळ तांत्रिक कारणांवरून सहाय्य नाकारणे योग्य ठरू शकत नाही.

## स्ट सेवानिवृत्त कामगार संघर्ष समितीचा भव्य मेळावा, प्रलंबित देणी तातडीने अदा करण्याची जोरदार मागणी




**दै. सिंहवाणी वृत्त, डोंबिवली**

बेस्ट सेवानिवृत्त कामगार संघर्ष समितीच्या वतीने आज डोंबिवली येथील पौर्णिमा सभागृहात भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास शेकडो बेस्ट सेवानिवृत्त कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपस्थिती लावली. उपस्थितांनी बेस्ट प्रशासन, महापालिका आयुक्त, महापौर, उपमहापौर तसेच महाराष्ट्र शासन यांच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला. मेळाव्यात जुलै अखेरपर्यंत सर्व बेस्ट सेवानिवृत्त कामगारांची ग्रॅज्युटी व इतर प्रलंबित देणी एकरकमी अदा करण्याचे दिलेले आश्वासन बेस्ट प्रशासनाने पूर्ण केले नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. एकीकडे बेस्ट प्रशासन सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना, दुसरीकडे आपल्या हक्काच्या ग्रॅज्युटी व इतर सेवानिवृत्तीच्या लाभांसाठी बेस्टचे सेवानिवृत्त कामगार रस्त्यावर उतरून संघर्ष करत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली.

मेळाव्यात सवार्नुमते ठराव मंजूर करून बेस्ट दिनाचे औचित्य साधून सर्व सेवानिवृत्त कामगारांची ग्रॅज्युटी व इतर सर्व प्रलंबित देणी तात्काळ एकरकमी अदा करावीत, अशी मागणी करण्यात आली. तसेच सेवानिवृत्त कामगारांना मोफत वैद्यकीय सुविधा, मोफत बस पास आणि त्यांच्या **मुलांना बेस्टच्या भरती प्रक्रियेत प्रथम प्राधान्य देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली. यावेळी बेस्ट सेवानिवृत्त कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष भाई पानवडीकर यांनी सांगितले की, बेस्ट प्रशासनाने तातडीने सर्व मागण्या मान्य करून प्रलंबित देणी एकरकमी अदा करावीत. अन्यथा सर्व बेस्ट सेवानिवृत्त कामगार आपल्या कुटुंबीयांसह मुंबईतील आझाद मैदानावर भव्य आक्रोश मोर्चा काढून बेस्ट भवनावर धडक देतील. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी बेस्ट प्रशासनाची असेल." बेस्ट सेवानिवृत्त कामगारांच्या न्याय्य मागण्या तातडीने मान्य करून त्यांना न्याय देण्याची मागणी यावेळी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली. प्रतिनिधी रविंद्र जाधव डोंबिवली.

## महापालिकेच्या उद्यान विभागातील कथित गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करा : राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) ची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागात झालेल्या कथित गैरव्यवहार व आर्थिक अनियमिततेची उच्चस्तरीय चौकशी करून



दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) नागपूर शहराचे संघटन सचिव नंदकिशोर माटे यांनी पत्रकार परिषदेत मंगळवारी केली. माटे यांनी सांगितले की, गड्डी गोदाम ते ऑटोमोटिव्ह चौक या मेट्रो मार्गावरील पुलाखालील दुभाजकाचे सुशोभीकरण, वृक्षारोपण व देखभालीच्या कामाबाबत माहिती अधिकारातून माहिती मागविण्यात आली होती. मात्र सुरुवातीला समाधानकारक माहिती देण्यात आली नाही. त्यानंतर पुन्हा माहिती मागितल्या नंतर संबंधित कामाचे कंत्राट १९ मे २०२५ रोजी संपुष्टात आल्याचे उत्तर देण्यात आले. मात्र, महा मेट्रोकडून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित परिसरातील वृक्षारोपण, देखभाल, दुरुस्ती अथवा सुशोभीकरणाची कोणतीही कामे महा मेट्रोने केलेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

दुसरीकडे महापालिकेच्या नोंदीनुसार या कामासाठी १ कोटी ४१ लाख ९९ हजार ६६९ रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली असून, आठ महिन्यांत काम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र आजही काम अपूर्ण असल्याचा आरोप त्यांनी केला. संबंधित कंत्राटदाराकडे विचारणा केली असता त्यांनी महापालिकेशी संपर्क साधण्यास सांगितल्याचेही माटे यांनी नमूद केले. त्यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय झाला असून संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यात संगनमत असल्याची शंका निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी.

---

## आजनी येथे वाचनालयात गुरू पौर्णिमा साजरी

**दै. सिंहवाणी वृत्त, आजनी**

बुधवार दिनांक २९ जुलै रोजी गुरु पौर्णिमा निमित्त कामठी तालुक्यातील आजनी येथील सावित्रीबाई ज्योतीराव फुले



निःशुल्क अभ्यासिका आणि वाचनालयात ग्रंथ हेचि गुरु या तत्त्वाला अनुसरून विविध ग्रंथांचे पूजन करून ग्रंथाचे महत्त्व समजून घेण्यात आले. या प्रसंगी वाचनालयाचे संस्थापक लीलाधर दवंडे, वसंतराव घोडे, राजकुमार दवंडे, अंकित जेवडे, सृष्टी दवंडे, सुहानी फुकट, रोशन दवंडे, प्रियंका घोडे, कार्तिक दवंडे आणि श्रावणी मासोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

## प्रनाग हायस्कूल आजनगाव शाळेत गुरुपौर्णिमा निमित्ताने विविध प्रकारचे वृक्षदान व संवर्धन कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

आज बुधवार (ता. २९ जुलै) रोज ला प्रनाग हायस्कूल आजनगाव येथे गुरु पौर्णिमा (आषाढ पौर्णिमा) निमित्ताने शाळेचे शिक्षक गुणरत्न गजभिये यांनी शाळेस विविध प्रजातीचे वृक्षदान केले. मागील ५-६ वर्षापासून वृक्षदान, त्यांची लागवड व संगोपन हा उपक्रम विद्यार्थी, पालक, नागरिक व माजी विद्यार्थी यांच्या सहकार्याने संयुक्त उपक्रम म्हणून शाळेत दरवर्षी राबविला जात आहे.



यावर्षी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने हे दुहेरी कार्यक्रमाचे उपयोजन करण्यात आले.

गुरु पौर्णिमा व वृक्षारोपण हा कार्यक्रम शाळेचे माजी विद्यार्थी, पालक व मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. आजच्या दिवसाचे महत्त्व व गुरुजनांचे स्थान याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

परीसंस्थेतील झाडाचे महत्त्व, मानवासाठी व जगण्यासाठी झाडाचे महत्त्व, निसर्गाच्या समतोलासाठी झाडाचे महत्त्व इ. घटक विद्यार्थ्यांना समजावून, झाडे जगवा, पृथ्वी वाचवा, हा संदेश प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी शाळेत दरवर्षी हा कार्यक्रम राबविला जातो.

कार्यक्रमाला माजी उपसरपंच रवींद्र फटिंग, चांगदेव मोटघरे, दत्तू ठोंबरे, पोलिस मित्र स्वरा साठवणे, करण सुर्यवंशी, मोतीलाल ठोंबरे, संकल्पना संयोजक गुणरत्न गजभिये सह शाळेचे सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापक कु. बाबुलकर, शिक्षकवृंद सुरेश टांगले, राजू गेडाम, लिपिक सुनील डोंगरे, मदतनीस मुंगाटे, क्षिरसागर उपस्थित होते व या सर्वांनी मिळून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

---

## रेल्वे रुळांवर वन्यजीवांचा संहार सुरूच : अस्वलीचा मृत्यू, व्याघ्र दिनाच्या पूर्वसंध्येला वाघाचा बचाव

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

बल्लारशाह - गोंदिया रेल्वेमार्गावरील चंद्रपूर प्रादेशिक वनपरिक्षेत्रातील अष्टभुजा रमाबाई नगरजवळील कक्ष क्रमांक ४०७ परिसरात मंगळवार, २८ जुलै रोजी वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने दोन परस्परविरोधी घटना घडल्या. पहाटे रेल्वेच्या धडकेत एका अस्वलीचा मृत्यू झाला, तर त्याच दिवशी दुपारी लोको पायलटच्या प्रसंगावधानामुळे रेल्वे रुळ ओलांडणाऱ्या वाघाचा जीव थोडक्यात बचावला. विशेष म्हणजे, जागतिक व्याघ्र दिनाच्या अवघ्या एक दिवस आधी घडलेल्या या घटनेमुळे वन्यजीव संरक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



चंद्रपूर प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी नायगमकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ जुलै रोजी पहाटे सुमारे ४ वाजताच्या सुमारास चांदा फोर्टच्या दिशेने येणाऱ्या रेल्वेची एका अस्वलीला जोरदार धडक बसली.

या अपघातात अस्वलीचा जागीच मृत्यू झाला. बल्लारशाह- गोंदिया रेल्वेमार्गावर रेल्वे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या अस्वलांची संख्या आता १४ वर पोहोचली असून, वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे वन्यजीवप्रेमी आणि पर्यावरण अभ्यासकांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

याच दिवशी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास चांदा फोर्टच्या दिशेने येणाऱ्या रेल्वेच्या लोको पायलटला रेल्वे रुळ ओलांडणारा वाघ दिसला. त्यांनी तत्काळ सतर्कता दाखवत सलग हॉर्न वाजविला आणि आपत्कालीन ब्रेक लावून रेल्वे थांबविली. त्यामुळे वाघ सुरक्षितपणे जंगलाच्या दिशेने निघून गेला. वाघ सुरक्षित अंतरावर गेल्यानंतरच रेल्वे पुढे सोडण्यात आली. लोको पायलटच्या तत्परतेमुळे एका दुर्मिळ वन्यजीवाचा जीव वाचल्याने या घटनेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

हॅबिटॅट कंझर्व्हेशन सोसायटीचे अध्यक्ष दिनेश खाटे यांनी सांगितले की, बल्लारशाह- गोंदिया रेल्वेमार्गावर आतापर्यंत सुमारे १३० वन्यजीवांचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला आहे. हा संपूर्ण पट्टा अत्यंत संवेदनशील वन्यजीव भ्रमणमार्ग असून तेलंगणा, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या राज्यांना जोडणाऱ्या या मार्गावर वाघ, अस्वल आणि इतर वन्यप्राण्यांची नियमित वर्दळ असते.

त्यामुळे या मार्गावर तातडीने प्रभावी उपशमन उपाययोजना, वन्यजीवांसाठी सुरक्षित मार्ग तसेच रेल्वेचा वेग नियंत्रित करण्यासारखे उपाय राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. आणखी किती वन्यजीवांचे बळी गेल्यानंतर प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. घटनास्थळी हॅबिटॅट कंझर्व्हेशन सोसायटीचे अध्यक्ष दिनेश खाटे, रणजित मडावी, अनिकेत वनकर, गणेश मेश्राम, चंद्रपूर प्रादेशिक वनपरिक्षेत्राचे किटे, वनविकास महामंडळाचे मेश्राम तसेच वनपाल कांबळे यांनी पाहणी केली.

## हरदोली येथील श्री दत्त मंदिरात आमदार संजय पुराम यांनी घेतले श्री दत्तगुरूंचे दर्शन

### सर्वांच्या सुख-समृद्धी व मंगलमय भविष्यासाठी केली प्रार्थना



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

आमगाव-देवरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय पुराम यांनी हरदोली येथील प्राचीन व पवित्र श्री दत्त मंदिराला भेट देऊन भगवान श्री दत्तात्रेयांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी श्री दत्तगुरूंच्या चरणी नतमस्तक होत विधानसभा मतदारसंघातील तसेच राज्यातील सर्व नागरिकांच्या सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि मंगलमय भविष्यासाठी मनःपूर्वक प्रार्थना केली.

श्रद्धा, संस्कार आणि अध्यात्मिक परंपरेचा समृद्ध वारसा लाभलेल्या या पवित्र देवस्थानाला भेट देताना आमदार संजय पुराम यांनी मंदिरातील प्रसन्न वातावरणाचा अनुभव घेतला. या पवित्र स्थळी दर्शन घेतल्याने मनाला आत्मिक समाधान लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच अध्यात्मातून समाजात सकारात्मक ऊर्जा, बंधुभाव आणि सेवाभाव वृद्धिंगत होतो, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी श्री दत्तगुरूंच्या कृपादृष्टीने सर्वांच्या जीवनात आनंद, शांती, आरोग्य आणि समृद्धी नांदो, अशी प्रार्थना करण्यात आली. श्रद्धा आणि अध्यात्मिक मूल्ये जपत समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्य करण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# राज्यात एकाही शेतकऱ्याची आत्महत्या नको!

- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे सक्त निर्देश
- कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या सूचना
- मंत्रालयातून जिल्हाधिकाऱ्यांसोबत व्हीसीव्दारे बैठक
- १७ लाख शेतकऱ्यांच्या यादीनंतर दुसरी यादी पंधरा दिवसात

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती योजना जाहीर केली असून, या योजनेची तळागाळापर्यंत प्रभावी अंमलबजावणी करावी. कर्जबाजारीपणामुळे यापुढे राज्यात एकाही शेतकऱ्याची आत्महत्या होता कामा नये, असे सक्त निर्देश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. मंत्रालयातील महसूलमंत्र्यांच्या दालनात सहकार आणि महसूल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे हेदेखील उपस्थित होते.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली आहे. कोणताही पात्र कर्जदार शेतकरी या कर्जमाफीपासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे. या योजनेत प्रामुख्याने कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना आणि प्रोत्साहनपर लाभ अशा तीन घटकांचा समावेश आहे. यातून राज्यातील सुमारे ३२ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा, तर नियमित कर्ज भरणाऱ्या २४ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ दिला जाणार आहे.

**पहिल्या टप्प्यात १७ लाख कर्जखाती**

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात जवळपास १७ लाख (१६.९६ लाख) कर्जखात्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकांची ७.०३ लाख तर व्यापारी बँकांची ९.९३ लाख कर्जखाती आहेत. तर दुसरी यादीही पुढील पंधरा दिवसात प्रसिद्ध करण्यात येईल असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

**थकबाकीच्या रकमेतील तफावतीवर तोडगा**

गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या याद्यांमध्ये व्यापारी बँकांमधील एनपीए खातेदार शेतकऱ्यांच्या नावासमोर दर्शविलेली थकबाकी रक्कम आणि योजनेच्या पोर्टलवरील रक्कम यात काही ठिकाणी तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत स्पष्टीकरण देताना प्रवीण दराडे म्हणाले, अशी तफावत असल्यास योजनेच्या 'पोर्टलवरील' ३१ मार्च २०२६ पर्यंतची थकबाकीची रक्कम ग्राह्य धरण्यात यावी. तसेच, १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज न आकारण्याच्या शासनाच्या सूचनांना सर्व बँकांनी लेखी संमती दिली आहे.

**अशी असेल कर्जमुक्तीची प्रक्रिया**

-आधार प्रमाणीकरण पोर्टलवर दिसणारी रक्कम मान्य असल्यास शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण करावे. प्रमाणीकरण यशस्वी झाल्यावर त्यांना कर्जमुक्तीच्या रकमेची माहिती असलेली पावती मिळेल.

- थेट बँक खात्यात रक्कम - त्यानंतर ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या कर्जबाकीच्या लाभाची रक्कम डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा केली जाईल.

- कर्ज बेबाकी प्रमाणपत्र व नवीन पीककर्ज - कर्जमुक्तीनंतर शेतकऱ्यास 'कर्ज बेबाकी प्रमाणपत्र' देण्यात येईल. यानंतर या सर्व शेतकऱ्यांना बँकेमार्फत आगामी खरीप हंगामासाठी नवीन पीक कर्जाची उपलब्धता होईल.

- याद्यांची प्रसिद्धी - कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या बँकांच्या शाखा आणि विविध कार्यकारी सेवा संस्थांमध्ये लावल्या जातील.

**तक्रार निवारणासाठी जिल्हास्तरीय समिती**

जर एखाद्या शेतकऱ्याला पोर्टलवरील रक्कम किंवा कर्जाबाबतचा इतर कोणताही तपशील अमान्य असेल, तर तो पोर्टलवरच आपली तक्रार नोंदवू शकतो. या तक्रारींचे निवारण करण्यासाठी थेट जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती काम पाहणार आहे.

**बँकांसाठी विशेष सवलत**

शेतकऱ्यांचे कर्जखाते अनुत्पादित (एनपीए) झाले असल्यास, बँकांना थकीत कालावधीच्या टप्प्यानुसार विशेष सवलत (हेअर कट) दिली जाणार आहे. त्याची तडजोड रक्कम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे:

**अनुत्पादक कर्जाचा दिनांक व तडजोडीची रक्कम:**

- दि. ३०/०९/२०२१ किंवा त्यापूर्वी: कर्जबाकीच्या ३५ टक्के
- दि. ०१/१०/२०२१ ते ३०/०९/२०२२: कर्जबाकीच्या ४५ टक्के
- दि. ०१/१०/२०२२ ते ३०/०९/२०२३: कर्जबाकीच्या ५५ टक्के
- दि. ०१/१०/२०२३ ते ३०/०९/२०२४: कर्जबाकीच्या ७० टक्के
- दि. ०१/१०/२०२४ ते ३०/०९/२०२५: कर्जबाकीच्या ८५ टक्के

थोडक्यात

## ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान व अमर नगर मंडळाची तीर्थक्षेत्र दर्शन सहल उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, नागपूर आणि अमर नगर ज्येष्ठ नागरिक मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी धापेवाडा, आदासा व कोराडी या तीर्थक्षेत्रांची दर्शन सहल उत्साहात आयोजित करण्यात आली. या सहलीत ५९ ज्येष्ठ नागरिकांनी सहभागी होत अध्यात्मिक वातावरणाचा आनंद घेतला. सहली दरम्यान भाविकांनी धापेवाडा येथील श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिरात दर्शन घेतले. त्यानंतर आदासा येथील प्रसिद्ध श्री गणेश मंदिरात दर्शन घेऊन कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिराला भेट दिली. विदर्भातील जागृत शक्तीपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मंदिरात दर्शन घेतल्याने सहभागी ज्येष्ठ नागरिकांना आध्यात्मिक समाधान लाभले. ही सहल ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे सचिव राजूजी मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अमर नगर ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष देविदासजी आगरकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आली.

सहल यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सचिव वसंतराव इझनकर, उपाध्यक्ष गणपतराव निंबाळकर, रमेश जिल्हारे, डॉ. राजेश कुऱ्हाडे, विलास वाकडे, श्री. भोयर, सौ. शोभा आगरकर, सौ. निंबाळकर, सौ. इझनकर, सौ. रासेकर आणि सौ. ढोले यांनी विशेष परिश्रम घेतले. धार्मिक स्थळांच्या दर्शनासोबतच ज्येष्ठ नागरिकांमध्ये परस्पर संवाद, स्नेह आणि आपुलकी वृद्धिंगत होण्यास या सहलीमुळे मोठी मदत झाली. अशा प्रकारच्या तीर्थक्षेत्र दर्शन सहली नियमितपणे आयोजित करण्यात याव्यात, अशी अपेक्षा सहभागी भाविकांनी व्यक्त केली.

## वृक्षारोपणाने स्व. अजित पवार यांना आदरांजली



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित दादा पवार यांची जयंती साजरी करत, 'झाडे लावा, झाडे वाचवा' या घोषणेसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस आनंद सिंह यांच्या नेतृत्वाखाली गोधनी नगरपालिका आणि जिल्हा परिषद परिसरात एका भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वृक्षारोपण मोहिमेत जांभूळ, पिंपळ, आंबा, कडुलिंब आणि पेरू यांसारख्या फळ आणि सावली देणाऱ्या झाडांसह विविध प्रजातींच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करून वृक्षारोपणाला सुरुवात झाली. विशेषतः महिला सामाजिक कार्यकर्त्यांनी केवळ उत्साहाने सहभागच घेतला नाही, तर भविष्यातही वृक्षारोपणाला प्रोत्साहन देण्याची आपली प्रतिज्ञा पुन्हा एकदा व्यक्त केली. वृक्षारोपण कार्यक्रमास नगरपरिषदेच्या सभापती ठाकरे, रमा पाटील, अरुणा नानोटे, वैशाली सावरकर, अमिषा गेडाम, प्रीती ताई, राणी ताई, स्वाती ताई, जानकी सावरकर, सतीश इंगोले, नवल डेव्हिड, रितेश लक्केवार, बच्चू तिवारी आदींनी अथक परिश्रम घेतले.

## पारशिवनीत अवैध दारू पकडली



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पारशिवनी पोलिसांनी धाड टाकून ५५ दारूच्या बॉटल पकडल्या. यात गाडीच्या किमतीसह ८६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. ही कार्यवाही मंगळवारी सायंकाळी पालोरा मार्गावर करण्यात आली. मोहन शामराव बिहुने (३६ राहणार मेहंदी) याच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला. पारशिवनी पालोरा मार्गावर एक इसम दुचाकीवर दारूची वाहतूक करीत असल्याची माहिती पारशिवनी पोलिसांना प्राप्त झाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी एम.एच. ४० सी.यु. १३०५ क्रमांकाच्या दुचाकीचा पाठलाग केला. दुचाकी अडवून तपासणी केली असता एका थैलित त्यांना देशी दारूच्या ४५निपा व विदेशी दारूच्या १० नीपा असा एकून ६५०० रुपयांच्या दारूच्या बॉटल आढळून आल्या. पोलिसांनी गाडीसह एकूण ८६,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.आरोपी मोहन शामराव बिहुने विरुध्द कलम ६५ (अ), (ई) म.दा.का. प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. ही कार्यवाही सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विशाल डोनेकर, पोलीस हवालदार संदीप नागोसे, पोलीस नायक वीरेंद्र नरड, पोलीस अंमलदार सुरज मोहेकर, अशोक निस्ताने, पृथ्वीराज चव्हाण यांचे पथकाने केली. पुढील तपास पारशिवनी पोलीस करीत आहे.

## सविता शशिकांत कुलकर्णी यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



शशांक कुळकर्णी यांच्या मातोश्री व रा. स्व. संघाचे जेष्ठ स्वयंसेवक शशीकांत कुळकर्णी यांच्या पत्नी सविता शशिकांत कुलकर्णी, माजी मुख्याध्यापिका सरस्वती माध्यमिक शाळा यांना आज सायंकाळी ६ वाजता देवाज्ञा झाली. अंत्यसंस्कार उद्या गुरूवारी रोजी सकाळी १०.३० वाजता अंबाझरी घाटावर करण्यात येईल. त्याच्या मागे त्यांची कन्या रूपाली सावजी व बराच मोठा आप्त परिवार परीवार आहे.

## गुरुपौर्णिमेनिमित्त साई मंदिरात भक्तिमय वातावरणात पूजा-अर्चना, प्रसादाचे वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**



गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त दरेकसा रोड, सालेकसा येथील श्री साई मंदिरात अत्यंत भक्तिमय वातावरणात श्री साईबाबांची विधिवत पूजा-अर्चना करून गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी साईबाबांच्या पालखीचीही विधीवत पूजा करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा धार्मिक सोहळा मोठ्या श्रद्धा, भक्तिभाव आणि उत्साहात पार पडला.

पूजा-अर्चनेनंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण मंदिर परिसर "ॐ साई राम" च्या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

या कार्यक्रमाला संजय क्षिरसागर, सतीश पटले, अजय क्षिरसागर, राजेश अग्रवाल, प्रदीप केडिया, बबलू कटरे, अर्जुनसिंह बैस, देवाजी भगत (पुजारी), उर्मिलाबाई क्षिरसागर, इंद्रकलाबाई भगत, महेश क्षिरसागर तसेच उमेश क्षिरसागर यांच्यासह सर्व सदस्यगण उपस्थित होते.

श्रद्धा, सेवा आणि गुरुभक्तीचा संदेश देणारा हा धार्मिक सोहळा भाविकांसाठी प्रेरणादायी ठरला.

## नक्षलग्रस्त सालेकसा परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष कृती आराखड्याची गरज

### आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्रातील युवकांना स्थानिक रोजगाराची अपेक्षा; उद्योग उभारणीची नागरिकांची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजू फुंडे**

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव-देवरी विधानसभा मतदारसंघातील सालेकसा तालुका हा नक्षलग्रस्त, अतिदुर्गम व आदिवासीबहुल परिसर आहे. या भागात शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात असल्या तरी स्थानिक स्तरावर मोठ्या उद्योगांची कमतरता आणि कायमस्वरूपी रोजगाराच्या अपुऱ्या संधीमुळे आजही अनेक युवक-युवती, महिला आणि कुटुंबप्रमुखांना नागपूर, पुणे, मुंबई तसेच इतर शहरांकडे रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत आहे. स्थलांतरामुळे अनेक कुटुंबांना आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे, शेतीकडे आणि घराच्या जबाबदाऱ्यांकडे पुरेसे लक्ष देता येत नाही. आर्थिक गरज म्हणून बाहेरगावी जावे लागत असल्याने काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही त्याचा परिणाम होत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांच्या मते, सालेकसा तालुक्यात शासनाच्या माध्यमातून औद्योगिक वसाहत, कृषी प्रक्रिया उद्योग, वनसंपदा प्रक्रिया उद्योग, बांबू व लघुउद्योग, कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे तसेच वर्षभर रोजगार उपलब्ध करून देणारे प्रकल्प सुरू करण्यात यावेत. स्थानिक स्तरावर रोजगार निर्माण झाल्यास युवकांचे स्थलांतर कमी होईल, कुटुंबाचे आर्थिक जीवनमान उंचावेल आणि मुलांच्या शिक्षणालाही चालना मिळेल. सालेकसा हा नक्षलग्रस्त आणि अतिदुर्गम भाग असल्याने या परिसरासाठी विशेष विकास पॅकेज, औद्योगिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा, सिंचन, पर्यटन विकास, आरोग्य सुविधा आणि शिक्षण क्षेत्रात अधिक निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, ग्रामपंचायतीपासून केंद्र शासनापर्यंत विविध स्तरांवर प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्व लोकप्रतिनिधींनी पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन सालेकसा तालुक्याच्या विकासासाठी एकत्रित प्रयत्न करावेत. रोजगार, उद्योग आणि विकासाच्या संधी उपलब्ध झाल्यास या दुर्गम नक्षलग्रस्त भागातील युवकांना स्वतःच्या गावातच सन्मानाने उपजीविका करता येईल आणि स्थलांतराचे प्रमाणही कमी होईल.

सालेकसा तालुक्यातील नागरिकांना आता केवळ आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष उद्योग, रोजगार, शिक्षण आणि विकासकामांची अपेक्षा आहे. शासनाने या नक्षलग्रस्त व अतिदुर्गम भागाच्या विशेष गरजा लक्षात घेऊन दीर्घकालीन विकास आराखडा राबवावा, अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

## गुरुपौर्णिमेनिमित्त राजा भोज योग अभ्यास केंद्रात गुरुंचा सन्मान

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**



भारतीय संस्कृतीतील गुरुपरंपरेचे महत्त्व अधोरेखित करत योग ही निरोगी आणि संतुलित जीवनाची गुरुकिल्ली असल्याचा संदेश गुरुपौर्णिमा सोहळ्यातून देण्यात आला. राजा भोज योग अभ्यास केंद्र, काटोल व पतंजली योग समिती, काटोल यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषद काटोल विरोधी पक्षनेत्या वैशालीताई ठाकूर या होत्या. सत्कारमूर्ती म्हणून ज्येष्ठ योगगुरू अशोक कडू यांचा गौरव करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून नगरसेविका लताताई कडू, योगनृत्य ग्रुपच्या संचालिका ज्योती वानखेडे व ज्येष्ठ योगसाधक शिला गिरडकर उपस्थित होत्या.

अध्यक्षीय भाषणात वैशालीताई ठाकूर यांनी भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विशद केले. त्या म्हणाल्या, "गुरु हे व्यक्तिमत्त्व घडविणारे खरे शिल्पकार असतात. जीवनात यश, संस्कार आणि योग्य दिशा प्राप्त करण्यासाठी प्रत्येकाला गुरुचे मार्गदर्शन आवश्यक असते. योग ही आपल्या ऋषिमुनींची अमूल्य परंपरा असून नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी, मन प्रसन्न आणि जीवन सकारात्मक बनते. प्रत्येकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे."

यावेळी योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल योगगुरू अशोक कडू यांचा राजा भोज योग अभ्यास केंद्र व पतंजली योग समिती, काटोल यांच्या वतीने शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या योगसेवेचे कौतुक करून समाजात निरोगी जीवनशैली रुजविण्यासाठी त्यांनी केलेल्या कायार्चा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोहर पठाडे यांनी केले. सूत्रसंचालन रामकृष्ण जंगले यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. राजेंद्र टेकाडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. योगेश चरडे, राजेंद्र मानेराव, अरुण पांडे, उत्तम मनकवडे, नरेंद्र बांबल, अजय बेले, वैकुंठ मुसळे, माणिक कामडी, मधुकर रमधम तसेच योग केंद्र महिला प्रमुख अर्पणा कोल्हे यांचे सहप्रमुख शीला काकडे, कल्पना पाटील, प्रतिभा इंगोले, रेखा कोल्हे, सुनीता वरोकर, रंजना सावरकर, वर्षा ठाकरे आदिंसह राजा भोज योग अभ्यास केंद्र व पतंजली योग समितीचे सर्व योगसाधक आणि योगसाधिकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास योगप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

## गहु हिवरा येथील शाळेच्या इमारतीचा स्लॅब कोसळला, निकृष्ट दर्जाच्या बांधकामाचा आरोप, चौकशी करून कारवाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**



पारशिवनी तालुक्यातील खंडाळा (घ) ग्रामपंचायत अंतर्गत गहु हिवरा येथील जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामात गंभीर भ्रष्टाचाराचा प्रकार समोर आला आहे. बुधवारी २९ जुलै रोजी स्लॅबचे काँक्रीटीकरण सुरू असताना अर्धे काम पूर्ण होताच चतावर टाकलेल्या स्लॅबचा काही भाग कोसळला. यामुळे बांधकामाच्या दर्जाबाबत तीव्र संशय निर्माण झाला आहे.

ही घटना घडली तेव्हा मजूर काम करत होते व शाळेला सुट्टी असल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र विद्यार्थ्यांच्या जिवाच्या सुरक्षिततेशी खेळ करणाऱ्या या प्रकारामुळे परिसरात मोठा संताप व्यक्त होत आहे. हे शाळा इमारत बांधकाम जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या समग्र शिक्षा अभियान अंतर्गत असून यावर संबधीत तांत्रिक यंत्रणेचे दुर्लक्ष असल्याचे आरोप केला जात आहे.

या प्रकरणी खंडाळा (घ) येथील नागरिकांनी संबंधित बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, "शासकीय निधीतून उभारण्यात येणाऱ्या शाळेच्या इमारतीचे काम दर्जेदार व सुरक्षित होणे अत्यावश्यक आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी." संबंधित बांधकाम ठेकेदाराचा परवाना तात्काळ रद्द करावा. तसेच संबंधित अभियंते व कामावर देखरेख करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी अशा मागणीने जोर पकडला आहे.

या घटनेमुळे गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. याविषयी गटशिक्षणाधिकारी यांना माहिती विचारण्याचा प्रयत्न केला असता सविस्तर माहिती नसल्याचे सांगितले. आता यावर प्रशासन किती गंभीर दखल घेणार याकडे लक्ष वेधून आहे. निखिल पाटील माजी ग्रामपंचायत सदस्य यांनी व गावकरी यांनी कठोर कार्यवाहीची मागणी केली आहे.

थोडक्यात

## केदारपुर येथे आर्थिक आणि डिजिटल साक्षरता शिबिर संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

काटोल ना डी से को व नाबार्ड यांच्या संयुक्त विद्यमानाने केदारपुर येथे आर्थिक आणि डिजिटल साक्षरता शिबिर कॅम्प आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष लाडगाव सेवा सोसायटीचे अध्यक्ष विनायकराव मानकर हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून नंदकिशोर राजूरकर व विजयराव जाधव तसेच मोहन पांडे हे होते. विजयराव जाधव यांनी आर्थिक डिजिटल व्यवहाराबाबत सर्व गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मोहन पांडे यांनी गावकऱ्यांना आर्थिक फसवणूक कशा प्रमाणे होतात व अंधश्रद्धेबद्दल मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे प्रमुख पाहुणे नंदकिशोर राजूरकर यांनी सुद्धा मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विनायकराव मानकर यांनी गावकऱ्यांना व्यवहार कशा पद्धतीने केल्या जाते. या बाबद मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोसायटीचे सचिव मनीष भागवत यांनी केले तसेच आभार प्रदर्शन सेवा सोसायटीचे सदस्य निळकंठराव गजभिये यांनी केले. कार्यक्रमाला सेवा सोसायटीचे सर्व संचालक मंडळ अविनाश शेटे, ज्ञानेश्वर कोहळे, ज्ञानेश्वर राऊत, रामराव राऊत, जितेंद्र वंजारी, नामदेव क्षीरसागर, गुलाब भिंगारे, दिनेश मानकर, प्रदीप वंजारी, संदीप क्षीरसागर, सुनील शेंद्रे, संजय भलावि व इतर गावकरी मंडळी उपस्थित होते.

## प्रकाशगड येथे कंत्राटी कामगारांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक बैठक



**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई/ नागपूर**

प्रकाशगड, मुंबई येथे महावितरणचे अधिकारी, क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस व स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीच्या प्रतिनिधींसोबत तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस राज्य कार्याध्यक्ष विक्की कावळे व राज्य उपाध्यक्ष धिरज घायवट उपस्थित होते. बैठकीत कंत्राटी कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक सबस्टेशनवर पुरेसे ऑपरेटर नियुक्त करून साप्ताहिक सुट्टी देणे, स्टेशनरी साहित्य व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करणे, सुरक्षा साहित्य वाटप, दर महिन्याच्या ७ तारखेला वेतन अदा करणे, वेतनातील कपात, बोनस, रजा व थकीत एरिअर्स, पेमेंट स्लिप, ढॠव एरक्ळ तसेच इतर विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली.

बैठकीत दोन सबस्टेशनसाठी एक रिलीव्हर ऑपरेटर नियुक्त करून सर्व ऑपरेटरांना साप्ताहिक सुट्टी देण्याचे आश्वासन देण्यात आले. उर्वरित सबस्टेशनवर आवश्यक सुविधा व सुरक्षा साहित्य लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे संबंधित कंपन्यांनी सांगितले. वेतन वेळेत देण्यासाठी हजेरीपत्रक ३ तारखेपर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून विलंब करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. बोनस, थकीत एरिअर्स तसेच पीएफ व ESIC संदर्भातील प्रलंबित बाबींची चौकशी करून लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. तसेच कामगारांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करण्यासाठी संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींचे संपर्क तपशील संघटनेला उपलब्ध करून देण्यात आले. बैठकीतील निर्णयांमुळे कंत्राटी कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीस गती मिळेल, असा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## नांदा पुनर्वसन वस्तीत महिला, दिव्यांग व्यक्तीसाठी एसटी हाफ तिकीट कार्ड नोंदणी

### आशिष राऊत यांचा स्तुत्य उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

कोराडी ग्रामपंचायत चाच एक भाग नांदा पुनर्वसन वस्तीमध्ये महिला, मुली जेष्ठ नागरिक, दिव्यांगासाठी आशिष राऊत कोराडी ग्रामपंचायतचे माजी उपसरपंचतर्फे भव्य निःशुल्क कार्ड नोंदणी शिबिर घेण्यात आले. २ दिवसात ३१३ नागरिकांनी ल्लू कार्ड साठी नोंदणी केली असल्याची माहिती आशिष राऊत यांनी दिली आहे सदर प्रोग्राम पूर्णतः निःशुल्क राबविण्यात आला.

आशिष राऊत नेहमीच विविध महापुरुष, जयंती निमित्त, आणि गरीब विद्यार्थ्यांना शालेय मदतीसाठी नेहमीच धाऊन जातात नांदा पुनर्वसन वस्ती मध्दे मोठ्याप्रमाणात गरीब कामगार वर्ग राहतो त्यांचे मुली नागपूर ला शाळेत शिकतात त्यांना एसटी मंडळने सुरू केलेली स्कीम एनसीएमसी कार्ड निःशुल्क मिळाल्याने महिला वर्गांच्या आणि मुलीच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता सकाळी ११ वाजता पासून ते रात्री १०.३०वाजतापर्यंत प्रचंड नागरिकांची गर्दी दिसून येत होती आशिष राऊत मित्र परिवार तर्फे माजी ग्रामपंचायत सदस्य हेमराज चौधरी समाजसेवक राजेश बारमांते,, प्रवीण महाजन, शुभम गावंडे, रुपेश महाजन, राहुल वैद्य, धीरज ढोले, विक्की विठोले, अनुप गिरडकर, प्रसाद गिरडकर, प्रफुल गावंडे, हर्षल कुंजारकर, ऋषभ बानाइत, शिवम रॉय, मनिषा बर्डे, विद्या वाघ, आँचल घरडे, यांनी त्यांच्या या सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम केले.

# मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासन प्रयत्नशील : मुख्यमंत्री

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नैसर्गीक अधिवास कायम राखत वैज्ञानिक दृष्टीकोणातून राज्यात व्याघ्र संवर्धनाची अंमलबजावणी सुरू आहे. हे कार्य पुढे घेवून जाण्यासाठी नवी पंचसुत्री आखण्यात आली आहे. तसेच मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे, प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या औचित्याने वन विभागाद्वारे येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेत (आयआयएम) आयोजित परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. वनमंत्री गणेश नाईक, शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) श्रीनीवास राव यांच्यासह कंबोडीया, भुतान आणि बांग्लादेशातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वाघ हा नैसर्गीक अधिवास आणि अन्न साखळीचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या संवर्धनातून पर्यावरणाचे व वनांचे संरक्षण होते. म्हणूनच राज्यात वैज्ञानिक दृष्टीकोणातून व्याघ्र संवर्धन कार्य सुरू आहे. राज्यातील ६ व्याघ्र प्रकल्पांच्या कोअर भागातून गावांचे स्थलांतरण करण्यात आले व नवीन बफर क्षेत्र तयार करण्यात आले. वनविभागाच्या नवीन धोरणामुळे व्याघ्र प्रकल्पा शेजारील गावकऱ्यांनी पुनर्वसन व स्थलांतरासाठी पुढाकार घेतला आहे. मानव वन्यजीव संघर्ष दुर करण्यासाठी व्याघ्र प्रकल्पालगत गावांमध्ये नियोजनबद्ध कार्यपद्धती आखण्यात आली आहे. व्याघ्र हालचालीसाठी कॅमेरा ट्रॅकींग, एआय आधारित अर्ली वॉर्निंग सिस्टीम आदी उपाय योजना करण्यात आल्या आहेत. यामुळे वाघ, जैवविविधता आणि पर्यटन यांच्या संवर्धनासाठी नवी परिसंस्था उभी राहिली आहे. परिणामी २०१४ मध्ये राज्यात असलेली वाघांची १९० ही संख्या वाढून ४४४ झाली आहे व नवीन वाघ गणनेत ही संख्या ६०० च्या वर गेल्याचे चित्र दिसेल, असे त्यांनी सांगितले.

जगातील व्याघ्र संख्येच्या ७५ टक्के वाघ भारतात आहे आणि भारतातील वाघांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर आहे. गेल्या दोन दशकांपासून व्याघ्र संवर्धनासाठी उचलण्यात आलेल्या महत्वाच्या पाऊलांमुळे देशात वाघांच्या संख्येत महाराष्ट्र पहिल्या स्थानाकडे मार्गक्रमण करित आहे. वाघांच्या अस्तित्वाचे महत्व समजून घेत त्याचा मानवाच्या चरितार्थ व अस्तित्वासोबत समन्वय करून मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. मानव वन्यजीव संघर्ष कमी करणे, व्याघ्र अधिवास हरित उपजिविका अभियान राबविणे, व्याघ्र संवर्धनासाठी सीएसआर निधी उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर धोरण आखणे, शाश्वत पर्यटन धोरण तयार करून रोजगार निर्मिती करणे आणि पर्यटन वाढवतांना वनसंरक्षण व संवर्धनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे अशी व्याघ्र संवर्धनासाठी पंचसुत्री आखण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**राज्यात वृक्ष वाढविण्यासाठी ५ टिश्यु कल्चर प्रयोगशाळा- वनमंत्री गणेश नाईक**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात वनविभागाचा



चेहरामोहरा बदलत आहे. या विभागाच्या विकासासाठी सर्वसहकार्य मिळत आहे. म्हणूनच व्याघ्र संवर्धनासोबतच नवनवीन संकल्पनांच्या अंमलबजावणीतून वनविभागाचे कार्य पुढे जात आहे. राज्यात ३०० कोटी वृक्षारोपणाचा ध्यास विभागाने घेतला असून जास्तीत जास्त रोप तयार करण्यासाठी राज्यात ५ ठिकाणी टिश्यु कल्चर प्रयोगशाळा उभारण्यात आल्याचे, वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या औचित्याने वनविभागाद्वारे आयोजित याविशेष परिषदेच्या माध्यमातून राज्यातील व्याघ्र प्रकल्पांतून पर्यटनाला चालना व रोजगार निर्मिती होईल आणि येत्या काळात अशा आयोजनांना व्यापक स्वरूप प्राप्त होईल असा विश्वास शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केला.

**मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत महत्वाचे सामंजस्य करार**

वनविभागाच्या पुढील वाटचालीसाठी व व्याघ्र संवर्धनाच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमात महत्वाचे सामंजस्य करार करण्यात आले. या आयआरसीटीसी आणि वनविभागा दरम्यान शाश्वत वन्यजीव पर्यटनाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

बायएफ आणि वनविभाग यांच्या एचडीएफसी बँकेच्या परिवर्तन सीएसआर उपक्रमाद्वारे नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यात समृद्धी प्रकल्प राबविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. आरोहा ग्रुप, महिंद्रा हॉलिडेज अँड रिसॉर्ट इंडिया लिमिटेड आणि महाराष्ट्र वनविभाग यांच्यात शाश्वत पर्यटनावर आधारित पंचतारांकित लक्झरी प्रकल्प विकसित करण्यासाठी सामंजस्य करार असे एकूण ११ सामंजस्य करार करण्यात आले.

'समुदाय आधारित जीवनोपयोगी उपक्रम आणि हरित अर्थव्यवस्था','व्याघ्र संवर्धनासाठी सीएसआर गुंतवणूक','महाराष्ट्र-भारताचे प्रमुख वाघ (टायगर) पर्यटन गंतव्यस्थान' आणि 'मनुष्य-वाघ सहअस्तित्व आणि परिसंस्थेचे संवर्धन' विषयांवर विषयतज्ज्ञांचे सादरीकरण झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्याघ्र संवर्धनात उल्लेखनीय कायार्साठी एशियाटिक बिग कॅट सोसायटीचे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले.

तत्पूर्वी, प्रधान वनसंरक्षक एम एस रेड्डी यांनी प्रास्ताविक केले. मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांनी नागपूर ग्रोथच्या माध्यमातून व्याघ्र संवर्धनासाठी करण्यात आलेल्या विविध उपाय योजनांबाबत माहिती दिली. नागपूर विभागाचे वनसंरक्षक जी. गुरूप्रसाद यांनी आभार मानले.

# गुरुपौर्णिमेनिमित्त जामसावळी धामात भक्तीचा महासागर; अडीच लाख भाविकांनी चमत्कारिक श्री हनुमान महाराजांच्या चरणी वंदन केले

**दै. सिंहवाणी वृत्त, सौंसर**

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त परिसरातील प्रसिद्ध चमत्कारिक श्री हनुमान मंदिर (हनुमान लोक), जामसावळी धाम येथे भक्ती आणि श्रद्धेचा अभूतपूर्व महापूर उसळला. मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड तसेच देशातील विविध राज्यांतून आलेल्या सुमारे अडीच लाख भाविकांनी हनुमान दादांना गुरु स्वरूप मानून विधिवत पूजा-अर्चना केली आणि सुख, शांती, समृद्धी तसेच मंगलमय जीवनासाठी प्रार्थना केली.

भाविकांची प्रचंड गर्दी असूनही जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि मंदिर ट्रस्ट यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे संपूर्ण सोहळा शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत मंदिर परिसर "जय श्रीराम"



आणि "जय हनुमान" या जयघोषांनी दुमदुमून गेला.

**श्रीहनुमान हे गुरु-तत्त्वाचे प्रतीक**

सनातन परंपरेनुसार भगवान श्रीहनुमान हे अखंड भक्ती, सेवा, समर्पण, ज्ञान आणि गुरु-तत्त्वाचे साक्षात स्वरूप मानले जाते. अशी धार्मिक श्रद्धा आहे की गुरुपौर्णिमेच्या दिवशी श्रीहनुमानांना गुरु मानून त्यांच्या चरणी श्रद्धेने नतमस्तक झाल्यास जीवनातील संकटे दूर होतात, दुःखांचे निवारण होते आणि बल, बुद्धी, विद्या तसेच आध्यात्मिक उन्नतीचा आशीर्वाद प्राप्त होतो. याच अढळ श्रद्धेमुळे दरवर्षी गुरुपौर्णिमेला जामसावळी धामात लाखो भाविकांची उपस्थिती असते.

**भजन संध्येने भक्तिमय वातावरण**

गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला आयोजित भव्य भजन संध्येत सुप्रसिद्ध भजन गायक पुनीत कुशवाह यांनी आपल्या मधुर आणि ओजस्वी सादरीकरणाने भाविकांना मंत्रमुग्ध केले. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या



भजनांनी संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

**वैदिक मंत्रोच्चारात महाअभिषेक**

गुरुपौर्णिमेच्या सकाळी मुख्य यजमान जिल्हाधिकारी नीरज कुमार वशिष्ठ, पोलीस अधीक्षक प्रकाश चंद्र परिहार आणि मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष गोपाल शर्मा यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात श्रीहनुमान महाराजांचा विधिवत महाअभिषेक व पूजा-अर्चना करण्यात आली. त्यानंतर मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले करण्यात आले आणि दर्शनासाठी लांबलचक रांगा लागल्या.

**भाविकांसाठी व्यापक सुविधा**

मंदिर संस्थानाने भाविकांच्या सोयीसाठी मोठ्या प्रमाणावर व्यवस्था केली होती. निवासासाठी भव्य वॉटरप्रूफ मंडप, चोवीस तास मोफत महाप्रसाद, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय सेवा तसेच सौसर रेल्वे स्थानकापासून जामसावळी धामापर्यंत मोफत बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली.

जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभागाने सुरक्षा, वाहतूक, पार्किंग आणि गर्दी नियोजनाची उत्कृष्ट व्यवस्था केली होती. स्वयंसेवकांनीही भाविकांना सातत्याने मार्गदर्शन करून सेवाभावाचे दर्शन घडविले.

**श्रद्धा, शिस्त आणि सेवेचा अद्वितीय संगम**

गुरुपौर्णिमेनिमित्त जामसावळी धामात उसळलेल्या या भक्तीच्या महासागराने पुन्हा एकदा चमत्कारिक श्रीहनुमान महाराजांविषयीची भाविकांची अढळ श्रद्धा अधोरेखित केली. सुमारे अडीच लाख भाविकांची उपस्थिती, शिस्तबद्ध दर्शन व्यवस्था, स्वयंसेवकांचा सेवाभाव आणि प्रशासन व मंदिर ट्रस्टचे उत्कृष्ट नियोजन यामुळे हा सोहळा धार्मिक तसेच व्यवस्थापनाच्या दृष्टीने ऐतिहासिक आणि अविस्मरणीय ठरला.

# जनसेवा सप्ताहाचा समारोप अल्पसंख्याक सेवा संकल्प व संवाद कार्यक्रमाने उत्साहात

### सामाजिक सलोखा, ऐक्य आणि शासनाच्या योजनांची माहिती देत राष्ट्रवादी काँग्रेसचा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजू फुंडे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुलभाई पटेल व खासदार राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच राज्य सरचिटणीस (ओबीसी आघाडी) प्रभाकर दोनोडे, तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे आणि जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे यांच्या नेतृत्वात स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित "जनसेवा सप्ताह" उपक्रमाचा समारोप मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता श्री विठ्ठल मंदिर सभागृह, ग्रीन व्हॅली, आमगाव खुर्द (ता.



सालेकसा) येथे "अल्पसंख्याक सेवा संकल्प व संवाद" कार्यक्रमाने उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला मुस्लिम समाजाचे अध्यक्ष जमीर अली सैय्यद, जैन समाजाचे प्रतिनिधी नगरसेवक राजेश जैन, शीख समाजाचे प्रतिनिधी तथा भाजप तालुका महामंत्री विक्की भाटिया आणि जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी आयोजित संवाद कार्यक्रमात स्वर्गीय अजितदादा पवार यांनी अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेल्या विविध कल्याणकारी धोरणांचा व योजनांचा आढावा घेण्यात आला. शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, यासाठी जनजागृती करण्यात आली. तसेच गोंदिया जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजाच्या हितासाठी सातत्याने कार्य करणारे खासदार प्रफुलभाई पटेल आणि खासदार राजेंद्र जैन यांच्या विविध लोकाभिमुख उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

सालेकसा तालुक्यात सामाजिक सलोखा, बंधुता आणि शांतता टिकवून ठेवण्यात अल्पसंख्याक समाजाचे मोलाचे योगदान असल्याचे यावेळी वक्त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या विविध समाजांच्या प्रतिनिधींचा स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला मुस्लिम समाजाचे अध्यक्ष जमीर अली सैय्यद, राजेश जैन, विक्की भाटिया, अमीर अली सैय्यद, अहमद खान पठाण, उमद अली सैय्यद, युसुफ अन्सारी, अकिल सैय्यद, मुश्ताक अन्सारी, सलीम शेख, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक आघाडीचे तालुकाध्यक्ष नासिर अली सैय्यद, पत्रकार हेमंतभाई शर्मा, राजा कुरैशी, विठ्ठल मंदिराचे गुलाबभाऊ मदनकर, ज्येष्ठ नेते योगराज पटले, डॉ. जियालाल बघेले, बबलूभाऊ मानकर, ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र बडोले, महिला आघाडीच्या ममताताई बघेले, दिलीप ढेकवार तसेच पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सालेकसा शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, तालुका युवक आघाडीचे राहुल साठवणे, ऋषी बैस आणि सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

जनसेवा सप्ताहाच्या समारोपानिमित्त आयोजित या संवाद कार्यक्रमातून सामाजिक ऐक्य, सर्वधर्मसमभाव आणि अल्पसंख्याक समाजाच्या सक्षमीकरणाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

दैनिक सिंहवाणी वृत्त


थोडक्यात

## आर. एस. मुंडले विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

धरमपेठ शिक्षण संस्थेच्या आर. एस. मुंडले इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, पश्चिम समर्थ नगर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा तसेच इयत्ता दहावी व बारावीच्या शालांत परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा तसेच, शालांत परीक्षेत विविध विषयांत सर्वोच्च गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनाही विशेष प्रायोजित पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. अभिनव देशपांडे (कन्सल्टंट कॅन्सर व रोबोटिक सर्जन, नागपूर) उपस्थित होते. यावेळी धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उल्हास औरंगाबादकर, सचिव सुरेश देव, शाळेच्या मुख्याध्यापिका लखबीर कौर सुरी, पर्यवेक्षिका अमृता नगरकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्रांजली कुरळकर उपस्थित होते.

डॉ. अभिनव देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन आणि समाजाप्रती उत्तरदायित्व जपत यशाच्या नव्या शिखरांकडे वाटचाल करण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. शालांत परीक्षेत १००% गुण मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी सृष्टी रेवतकर हीने मनोगत व्यक्त केले. सोनाली भागवत यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली देव व किरण पालीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली कु. मैत्रेयी चारथल, कु. स्नेहा लुले व कु. इंद्रायणी भागवत यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप पसायदानाने झाला.

## न्याय्य मागण्या व कथित भ्रष्टाचाराविरोधात ९ ऑगस्टपासून आमरण उपोषण, शिक्षक हरिचंद खोटेले यांची घोषणा

### पत्रकार परिषदेत दिली माहिती; वेतनवाढ, निवड वेतनश्रेणीचा लाभ व उपसंचालकांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

खाजगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांशी पक्षपाती व भेदभावपूर्ण वागणूक दिली जात असून त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत असल्याचा आरोप श्री संत तुकाराम हायस्कूल, भोसा येथील



सहाय्यक शिक्षक हरिचंद सखाराम खोटेले यांनी केला आहे. आपल्या न्याय्य मागण्यांची पूर्तता व संस्थेतील कथित भ्रष्टाचाराची चौकशी करण्याच्या मागणीसाठी ९ ऑगस्ट २०२६ पासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला. सालेकसा मार्गावरील शुभमंगलम सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना खोटेले यांनी सांगितले की, ते गेल्या २६ वर्षांपासून श्री संत तुकाराम हायस्कूल, भोसा येथे सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. मात्र, संस्थेचे संचालक व मुख्याध्यापक यांनी नियमानुसार मिळणारी वार्षिक वेतनवाढ तसेच निवड वेतनश्रेणीचा लाभ अद्याप दिलेला नाही.

या संदर्भात आपण शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्याकडे अपील केली होती. त्यानुसार १३ मार्च २०१८ व ११ फेब्रुवारी २०२१ रोजी उपसंचालकांनी संस्थेला नियमानुसार वार्षिक वेतनवाढ व निवड वेतनश्रेणीचा लाभ देण्याचे आदेश दिले. मात्र, या आदेशांची अद्याप अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्याचे कारण पुढे करून संस्था प्रशासन आपल्या न्याय्य हक्कांपासून वंचित ठेवत असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी खोटेले यांनी संस्थेच्या शालेय विकास कामांमध्ये तसेच कर्मचारी भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात कथित भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला. याबाबत शिक्षण उपसंचालक, नागपूर तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक), गोंदिया यांच्याकडे तक्रारी सादर केल्याचे त्यांनी सांगितले. उपसंचालकांच्या आदेशानुसार वेतनवाढ लागू करणे, थकबाकीची रक्कम व्याजासह अदा करणे तसेच डिसेंबर २०२४ पासून निवड वेतनश्रेणीचा लाभ देण्याची मागणी आपण अनेक वेळा संबंधित अधिकारी, मुख्याध्यापक व संस्थाचालकांकडे केली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने ९ ऑगस्ट २०२६ पासून श्री संत तुकाराम हायस्कूल, भोसा समोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा त्यांनी दिला.

## मुसळधार पावसाने बाधितक्षेत्राची महापौर व अधिकाऱ्यांनी केली पाहणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसाने शहरातील अनेक ठिकाणी पाणी साचले होते. अनेक सखल भागात पाणी जमा झाले होते. मुसळधार पावसाने बाधित झालेल्या शहरातील विविध भागांचा महापौर श्रीमती निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, आयुक्त डॉ. विपीन यांनी भेटी देऊन पाहणी केली व बाधित क्षेत्रातील लोकांशी संवाद साधला. मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसाने अनेक शाळांमध्ये व वस्तींमध्ये पाणी जमा झाले होते. या शाळांमधील विद्यार्थ्यांना मनपाच्या अग्निशमन व आपात्कालिन सेवा विभागाच्या जवानांनी सुरक्षित बाहेर काढून बचावकार्य पूर्ण केले. हुडकेश्वर-नरसाळा या भागात अतिवृष्टीने नागरिकांना समस्यांना सामोरे जावे लागले होते. या भागाला महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी भेट देऊन अधिकाऱ्यांना नागरी सुविधा पूर्ववत करण्याच्या सूचना केल्या होत्या. शहरातील लक्ष्मीनगर, दीक्षाभूमी, गोपालनगर, सहकार नगर, पडोळे चौक, संभाजी चौक, गायत्रीनगरासह नरसाळा, हुडकेश्वर शहरातील विविध भाग जलमय झाला होता. मनपाच्या अग्निशमन व आपात्कालिन सेवा विभाग व घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचार्यांनी रस्ते व भुयारी मार्ग मध्ये साचलेले पाण्याचा निचरा करण्यात यश मिळविले.

# शिक्षण समिति की बैठक में विद्यार्थियों के हित, यूनिफॉर्म वितरण एवं १० हजार वृक्षारोपण अभियान सहित विभिन्न विषयों पर विस्तृत समीक्षा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

नागपुर महानगरपालिका की शिक्षण समिति की बैठक आज शिक्षण सभापति श्रीमती संतोष देवी दीपक लड्ढा की अध्यक्षता में संपन्न हुई। बैठक में महानगरपालिका के विद्यालयों से संबंधित विभिन्न महत्वपूर्ण विषयों पर विस्तृत समीक्षा करते हुए संबंधित अधिकारियों को आवश्यक निर्देश दिए गए।



बैठक में अतिरिक्त आयुक्त (सेवा) मुरुगानंथम एम., शिक्षण समिति की सदस्य वैशाली उदापूरकर, कांचन सतीश चौहान, सैय्यद मुस्कान एवं वर्षा बंडू डोंगरे, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, शिक्षण अधिकारी वंदना महाजन, सुभाष उपासे, उपशिक्षण सभापति जे. ई. चमाटे, श्री रोकडे, कार्यकारी अभियंता श्री. खोब्रागडे उपस्थित थे।

बैठक में विद्यार्थियों को वितरित किए जा रहे स्कूल यूनिफॉर्म की भी समीक्षा की गई। अधिकारियों ने जानकारी दी कि सभी महानगरपालिका विद्यालयों में यूनिफॉर्म का वितरण लगभग पूर्ण हो चुका है तथा अभिभावकों के हस्ताक्षरयुक्त प्राप्ति सूची भी शिक्षण विभाग को प्राप्त हो गई है, जिससे वितरण प्रक्रिया की पुष्टि हुई।

बैठक में पर्यावरण संरक्षण को बढ़ावा देने के उद्देश्य से महानगरपालिका के विद्यालयों के माध्यम से १० हजार वृक्ष लगाने का संकल्प भी लिया गया। इस अभियान में शिक्षक, विद्यार्थी एवं विद्यालय परिवार संयुक्त रूप से सहभागिता करेंगे। लगाए गए प्रत्येक पौधे की जियो-टैगिंग की जाएगी तथा उसके छायाचित्र एवं अभिलेख शिक्षा विभाग द्वारा संकलित किए जाएंगे, जिससे अभियान की नियमित निगरानी सुनिश्चित की जा सके।

बैठक के दौरान अतिरिक्त आयुक्त (सेवा) श्री मुरुगानंथम एम, ने हाल ही में रोटरी क्लब ईशान के सहयोग से आयोजित विद्यार्थियों के लिए हुए कार्यक्रम की सराहना करते हुए शिक्षण समिति एवं शिक्षण विभाग के सभी अधिकारियों एवं कर्मचारियों के कार्य की प्रशंसा की। उन्होंने इस सफल आयोजन के लिए पूरे विभाग को बधाई दी। बैठक के अंत में शिक्षण अधिकारी श्रीमती वंदना महाजन द्वारा धन्यवाद प्रस्ताव प्रस्तुत किया गया।

बैठक के समापन पर शिक्षण सभापति श्रीमती संतोष देवी दीपक लड्ढा ने कहा कि विद्यार्थियों के हितों की रक्षा, गुणवत्तापूर्ण शिक्षा, पारदर्शी प्रशासन तथा पर्यावरण संरक्षण जैसे विषयों पर शिक्षण समिति निरंतर सक्रिय रहकर प्रभावी एवं समयबद्ध कार्यवाही सुनिश्चित करेगी।

## ९ ऑगस्टच्या विदर्भ निर्माण जनसंकल्प लॉग मार्चची घोषणा, विदर्भ राज्याच्या मागणीसाठी जनजागरणाला वेग




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

"सर्वप्रथम विदर्भ वेगळा झालाच पाहिजे," अशी ठाम भूमिका मांडत विदर्भ राज्य आंदोलन समिती च्यावतीने आयोजित पत्रकार परिषदेत ९ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या 'विदर्भ निर्माण जनसंकल्प लॉग मार्च' व जनजागरण अभियानाची माहिती देण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील 'क्रांती दिन' निमित्त रविवारी, ९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता नागपूर येथील दीक्षाभूमी ते संविधान चौक असा लॉग मार्च काढण्यात येणार आहे.

नागपूरातील जनतेमध्ये स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीची तीव्रता अधोरेखित करण्याच्या उद्देशाने या लाँग मार्चचे आयोजन करण्यात आले असून, दुपारी १.३० वाजता संविधान चौक येथे लॉग मार्चचा समारोप होऊन विदर्भ निर्माण जनसंकल्प जाहीरसभा होणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी विदर्भ राज्याची तब्बल १२१ वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी आता कायमस्वरूपी निकाली काढावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली. पत्रपरिषदेत बोलतांना विदर्भ आंदोलनाचे नेते तथा माजी आमदार वामनराव चटप यांनी महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक स्थितीवर भाष्य केले. राज्यावरील कर्जाचा वाढता डोंगर, व्याजाचा बोजा, कंत्राटदारांची प्रलंबित देयके, महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली कर्जमुक्ती योजना २०२६ तसेच विविध थकबाकी व बिलांसह सुमारे ९६ हजार ४०० कोटींची देयके प्रलंबित असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती गंभीर बनल्याचे त्यांनी सांगितले.

याशिवाय, ९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान अहेरी येथेही विदर्भ निर्माण जनसंकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. पत्रकार परिषदेला विदर्भ आंदोलनाचे नेते तथा माजी आमदार वामनराव चटप यांच्यासह मुकेश मासुरकर, अरुणभाऊ केदार, नरेश निमजे, प्रशांत नखाते, भोजराज सरोदे आणि रमेश गजबे उपस्थित होते.

## जहाजावर १३ भारतीय खलाशी अडकून

**कीव्ह** : युक्रेनमधील चोर्नोमोर्स्क बंदरात उभ्या असलेल्या मालवाहू जहाजावरील १५ कर्मचाऱ्यांपैकी किमान १३ भारतीय खलाशी अडकले आहेत. काळ्या समुद्रालगतच्या या बंदराच्या परिसरात ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले सुरूच असल्याची माहिती फॉरवर्ड सीमेन्स युनियन ऑफ इंडिया (एफएसयूआय)ने दिली आहे. या अडकलेल्या कर्मचाऱ्यांवर अत्यंत भीषण आणि जीवघेणी परिस्थिती ओढवली असून, रशिया आणि युक्रेनमधील संघर्ष सुरू असल्याने त्यांना कोणत्याही क्षणी थेट हल्ला होण्याच्या सततच्या भीतीखाली जगावे लागत असल्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. युक्रेनमधील चोर्नोमोर्स्क बंदरात सध्या उभे असलेले एम.व्ही. एएमआयआर १ या जहाजावर १५ कर्मचारी आहेत.

## मातोश्री वृद्धाश्रमात २ ऑगस्टला रंगणार आषाढ कविसंमेलन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

२ ऑगस्टला सकाळी १० वाजता अक्षरक्रांती फाऊंडेशन व कला गौरव संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आदासा येथील मातोश्री वृद्धाश्रमात आपली सामाजिक बांधिलकी जपत वृद्धांचेसुद्धा मनोरंजन व्हावे या दृष्टीने सदर आषाढ कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळच्या पहिल्या सत्रात कला गौरव संस्थेद्वारे अध्यक्ष - डॉ. संगीता बनाईत आणि चमू द्वारा 'संगीतवारी' हा बहारदार मराठी भावगीत, भक्तीगीत, अभंग, बहिणाबाई चौधरी यांच्या स्वरबद्ध कविता तसेच अजरामर मराठी गीतांची मैफल आयोजित केली आहे. त्यानंतर वऱ्हाडी मायबोली हा विनोदी वऱ्हाडी कविता व किस्से यांचा विनोदी व लोटपोट हसविणारा बहारदार कार्यक्रम सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी दिवाकर देशमुख, अमरावती व सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी किशोर मुगल, चंद्रपूर यांचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

दुपारच्या दुसऱ्या सत्रात राजुरा येथील सुप्रसिद्ध कवी, गजलकार डॉ. किशोर कवठे यांच्या अध्यक्षतेखाली आषाढ कविसंमेलनाचे आयोजन केले असून या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून दैनिक राष्ट्रप्रकाश व देशोन्नती समूहाचे कार्यकारी संपादक तथा राष्ट्रीय कवी सुदर्शन चक्रधर, नागपूर, तथा स्वागताध्यक्ष म्हणून मातोश्री वृद्धाश्रम आदासा येथील व्यवस्थापक प्रदीप चंदनबटवे असतील. उपस्थित कवी-कवयित्री यांच्या एकापेक्षा एक दर्जेदार रचनांचे कविसंमेलन पार पडणार आहे. तर या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बल्लारपूर येथील प्रसिद्ध गजलकार सुनील बावणे तथा नागपूरच्या सुप्रसिद्ध गजलकार चित्रा कहाते करणार असून आभार प्रदर्शन डॉ. प्रतिभा कोकाटे करणार आहेत. या प्रसंगी बालभारतीच्या अभ्यासक्रमात साहित्याचा समावेश झाल्याबद्दल डॉ. मंदा नांदुरकर, अमरावती तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात साहित्याच्या समावेशाबद्दल प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' नागपूर तसेच प्रा. मीनल येवले याचा सुद्धा सत्कार आयोजित केला गेला आहे. विदर्भ साहित्य संघ अमरावती शहर सचिवपदी नियुक्ती झाल्याबद्दल ज्येष्ठ साहित्यिक आबासाहेब कडू, अमरावती तसेच बालसाहित्य कवितासंग्रह 'जंगल सफारी'च्या कवयित्री अँड. नीता कचवे, अमरावती तसेच 'मन जेव्हा हिरवळले'च्या कवयित्री मंजुषा कऊटकर यांच्या पुस्तक प्रकाशनाबद्दल सत्कार आयोजित केला आहे; असे कार्यक्रमाचे आयोजन करणारे 'अक्षरक्रांती फाऊंडेशन'चे अध्यक्ष शंकर घोरसे तथा 'कला गौरव संस्थे'च्या अध्यक्ष डॉ. संगीता बनाईत यांनी कळविले आहे.

## पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर आणि HER Foundation (Hygiene Education To Rural) यांच्या संयुक्त विद्यमाने सक्करदरा पोलीस स्टेशन येथे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मोफत दंत तपासणी व आरोग्य मार्गदर्शन शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. शिबिरात शासकीय दंत महाविद्यालयाचे असिस्टंट प्रोफेसर डॉ. अनिकेत थोटे, डॉ. मारुती मसल, डॉ. श्रेया जैन तसेच पाच सदस्यीय दंत वैद्यकीय पथकाने पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची दंत तपासणी केली. यावेळी दंत स्वच्छता, तोंडाच्या आरोग्याची योग्य काळजी, नियमित दंत तपासणीचे महत्त्व तसेच आवश्यक उपचारांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरादरम्यान अनेक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये दात व हिरड्यांशी संबंधित विविध समस्या आढळून आल्या. संबंधितांना पुढील उपचारांचा सल्ला देण्यात आला असून तोंडाच्या आरोग्याकडे नियमित लक्ष देण्याचे आवाहन तज्ज्ञ डॉक्टरांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सक्करदरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रमेश खुणे, पोलीस उपनिरीक्षक अश्विनी कात्रे आणि हेड कॉन्स्टेबल नेहा बाजपेयी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच Hygiene Education To Rural (HER) Foundation च्या प्रोजेक्ट ऑफिसर सीमा सावरकर या कार्यक्रमास उपस्थित होत्या. शिबिराला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा आरोग्यविषयक जनजागृती व तपासणी शिबिरांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## सायकल रॅलीतून निसर्ग संवर्धनाचा जागर, आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांचा विद्यार्थ्यांसोबत उत्स्फूर्त सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त पर्यावरण संरक्षण, सायकल संस्कृतीचा प्रसार आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी गडचिरोलीत मंगळवारी (दि. २८ जुलै) भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत गडचिरोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी विद्यार्थ्यांसोबत स्वतः सायकल चालवत सहभाग नोंदविला. त्यामुळे रॅलीला विशेष आकर्षण लाभले.



सायकल स्नेही मंडळ, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, ग्रीन्स संस्था, वनविभाग गडचिरोली तसेच आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली ही रॅली कारगिल चौक येथून प्रारंभ झाली. रॅलीचे उद्घाटन आमदार डॉ. मिलिंद नरोटे, विभागीय वनाधिकारी गणेश पाटोळे, गडचिरोली पोलीस ठाण्याचे ठाणेदार विनोद चव्हाण, मानद वन्यजीव रक्षक मिलिंद उमरे आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष उदय धकाते यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ग्रीन्स संस्थेच्या अध्यक्षा अंजली कुळमेथे, आर्ट ऑफ लिव्हिंगचे योगशिक्षक धनंजय पत्रे, योग शिक्षिका माधुरी दहिकर, सायकल स्नेही मंडळाचे अध्यक्ष प्रा. विलास पारखी, उपेंद्र रोहणकर, प्रा. सुनीता विजय साळवे, सुचिता धकाते, माजी प्राचार्य शेमदेव चाफले, मुख्याध्यापक सुधीर गोहणे, मुख्याध्यापिका सुचिता कामडी, शिक्षिका मीरा बिसेन, कवी लेनगुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ही रॅली सीसीएफ कार्यालय, वनभवन येथे पोहोचली. समारोपीय कार्यक्रम मुख्य वनसंरक्षक गजेंद्र नरवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत, "पर्यावरणाचे रक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. सायकलचा अधिकाधिक वापर करून प्रदूषणमुक्त आणि निरोगी समाज घडविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा," असे आवाहन केले.

या रॅलीत वसंत विद्यालय, स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, पीएम श्री जवाहरलाल नेहरू शाळा, भगवंतराव हायस्कूल तसेच विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पर्यावरण संरक्षणाचे फलक, घोषवाक्ये आणि सायकलद्वारे दिलेला जनजागृतीचा संदेश नागरिकांचे लक्ष वेधून घेत होता.

आयोजकांनी सांगितले की, गडचिरोली जिल्ह्यात जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त प्रथमच अशा स्वरूपाची सायकल रॅली आयोजित करण्यात आली. नागरिक आणि विद्यार्थ्यांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता हा उपक्रम दरवर्षी अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. सायकल रॅलीने दिला निसर्ग संवर्धनाचा संदेश गडचिरोली वासियांना दिला .

# पुलांच्या बांधकामांची चौकशी व्हावी!

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

अगदी वर्षभरापूर्वी बांधकाम पूर्ण होऊन दळणवळण सुरू झालेल्या नागपूर - जबलपूर महामार्गावरील रामटेक तालुक्यातील मनसर येथील उड्डाणपुलाच्या ऐन मध्यभागी मोठे भगदाड पडून त्याखालील सळाखी उघड्या पडल्याचे वृत्त वाचनात आले. अगदी वर्षभरात या पुलाचे असे हाल होणे म्हणजे भ्रष्टाचार कुठपर्यंत मुरला असावा, याचा अंदाज यायला लागतो. कोट्यवधी रुपये खर्च करून जर असे नित्कृष्ट दर्जाचे बांधकाम होत असेल तर या प्रकरणाची निःपक्ष तपासणी व्हायलाच हवी. आता या खड्डयामुळे एखाद्या वाहनाचा अपघात होऊन एखाद्याचा जीव गेला तर दोष कुणाला द्यायचा? हा प्रश्न वेगळाच.

एकतर देशांतर्गत अपघातांचे प्रमाण इतके वाढले आहे की, समृद्धी सारख्या महामार्गावर रोजच अपघात घडून त्यात निष्पाप जीव मृत्युमुखी पडत आहेत. एकीकडे हेल्मेटसक्ती केल्या जात आहे आणि दुसरीकडे रस्त्यांच्या तसेच पुलांच्या नित्कृष्ट बांधकामामुळे अपघातांची संख्या वाढत जात आहे. जिथे ब्रिटिशकालीन इमारती आणि पूल अजूनही तग धरून आहेत. छत्रपती शिवरायांच्या काळात बांधलेले गडकिल्ले अजूनही दिमाखात उभे असतांना काल परवा उद्घाटन झालेले पूल जर



कोसळत असतील तर बांधकाम नित्कृष्ट दर्जाचे तर झालेच, पण संपूर्ण बांधकाम विभागच संशयाच्या भोवऱ्यात सापडला जातो, हे नक्की.

मागे २०१५ ते २०१८ अशा तीन वर्षांत बांधून पूर्ण झालेला मनसर माहुली ते सालई बिटोली मार्गावरील पेंच नदीवर बांधण्यात आलेला पूल सुद्धा नित्कृष्ट बांधकामामुळे अगदी दोनच वर्षांत वाहून गेल्याची घटना ताजीच असतांना पुन्हा अशी घटना त्याच भागात घडावी म्हणजे कंत्राटदारांना कुणाचेतरी अभय असल्याचे संकेत देतात. या पुलाच्या बांधकामासाठी त्यावेळी १८ कोटींचा खर्च करण्यात आला होता.

असाच एक भ्रष्टाचार २०२२ मध्ये शिंदी रेल्वे जवळील दिग्रज शिवारात उघडकीस आला होता. तब्बल १७ लाख रुपये खर्च करून शेतात येण्या जाण्यासाठी उन्हाळ्यात बांधण्यात आलेला पूल पहिल्याच पावसात वाहून गेल्याने सदोष बांधकाम आणि कंत्राटदाराचे पितळ उघडे पडले होते. बिहार राज्याची परिस्थिती तर देशात सर्वात वाईट म्हणावी अशी आहे. गेल्या वर्षी तर नुसती पूल कोसळण्याची स्पर्धाच जणू लागलेली होती. बिहारमध्ये २०२२ ते २०२४ च्या दरम्यान तब्बल २१ पूल कोसळले होते. यावरून या सर्व पुलांच्या बांधकामातून कंत्राटदारासह कुणी कुणी आणि किती किती मलिदा खाल्ला याचा अंदाज बांधणे सुद्धा कठीण होऊन बसते.

मागच्याच काही दिवसांपूर्वी नांदेड शहरात नव्याने वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेल्या पुलाच्या भिंतीला भगदाड पडल्याचे वृत्त सर्वत्र व्हायरल झाले होते. यानंतर या उड्डाणपुलाची चौकशी करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण बोडार्ची समिती नेमण्यात आली होती. या समितीने पुलात भरण्यात आलेल्या भरावात अपेक्षित दर्जाच्या मुरुमाऐवजी मातीचे प्रमाण अधिक असल्याचे नोंदविले आहे. हल्ली तर अनेक पॉवर प्लांटमधील जमा केलेली राख अशा बांधकामांत सर्रास वापरली जाते. मात्र, हे सर्व करतांना त्यावर दाब देऊन भरण व्यवस्थित केल्या जाते की नाही, याची काळजी सहसा घेतली जात नाही. कामठी शहरात ड्रगन पॅलेस ते जयस्तंभ चौकादरम्यान नव्याने बांधण्यात आलेल्या रामानगर उड्डाणपुलाच्या बांधकामातील घोळ सुद्धा उघडकीस आला होता. हे प्रकरण कुठे दबले कोण जाणे. बुटीबोरी येथील उड्डाणपुलाचे प्रकरण सुद्धा असेच गाजले होते.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार हयातीत असतांना त्यांनी, " प्रत्यक्षात काम न करतांनाही अनेक कंत्राटदार विकासकामांची बिले सादर करून त्याचे पैसे मिळवत आहेत" असे विधान केले होते. यावरून देशातील बांधकामात होणाऱ्या घोळापासून लोकप्रतिनिधी सुद्धा अनभिज्ञ नाहीत. मग, जेव्हा सर्वांना सर्वकाही माहित असते, तर असे नित्कृष्ट दर्जाचे बांधकाम करण्याची कंत्राटदारांची हिंमतच होते कशी? हा प्रश्न बरेच काही सांगून जातो.

मागे अगदी पंधरा दिवसांपूर्वी वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला वर्धा जिल्ह्यातील वाबगाव - सैदापूर मार्गावरील सुद्धा पहिल्याच पावसात वाहून गेला होता. कंत्राटदार मात्र या घटनेनंतर पसार झाला होता. असे एक नव्हे अनेक पूल अगदी महिन्या दोन महिन्यांतच कोसळत असतील तर या बांधकामांची चौकशी व्हायला हवी. ज्याप्रमाणे ब्रिटिश कंत्राटदारांकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेत होते त्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र लिहून घेऊन बांधण्यात आलेले बांधकाम इतके इतके वर्ष चालेल याचा भरवसा देणारे प्रतिज्ञापत्र लिहून घेतले पाहिजे. जनतेकडून कर रूपात गोळा केलेला पैसा आणि देशाला कर्जाच्या खाईत लोटून जमा केलेला पैसा असा स्वार्थापायी कुणी लुटत असतील तर अशांना काळकोठडीत नक्कीच डांबायला हवे.

- ८४१२८७७२२०

# दिल्लीत पायलट गन आणि बिहारमध्ये एके-४७, देशात हे चाललंय काय!

रमेश लांजेवार
नागपूर

जेन-झी पुढे सरकार झुकले खरे; परंतु सरकारने दिलेले आश्वासने पुर्ण करतात की नाही यात अजूनही विद्यार्थांच्या व देशाच्या १४५ कोटी जनतेच्या मनात शंका निर्माण होत आहे !कारण जे काम सुरक्षा विभागाने करायला नको ते काम सुरक्षा विभागाने करून लोकशाहीला आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला कलंकीत केले आहे.कारण दिल्लीत पायलट गनचा वापर करून सरकारवर चहुबाजुंनी प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे,तर बिहारमध्ये सीवान येथे सुरक्षा विभागाने आंदोलकांवर एके -४७ चा वापर करून देशाला व संविधानाला धक्का दिला असून घृणास्पद कार्य केले आहे.पायलट गन किंवा एके-४७ आतंकवादी कारवाईसाठी किंवा खुंखार गुन्हेगारांसाठी वापरली जाते. परंतू ती विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला दरम्यान वापरण्यात आली.याची सविस्तर माहिती सरकारने व गृहमंत्रालयाने १४५ कोटी जनतेला दिली पाहिजे. कारण संपूर्ण सुरूक्षा यंत्रणा गृहमंत्रालयाच्या अंतर्गत येत असते.

आंदोलन पांगवण्यासाठी सुरक्षा यंत्रणांजवळ अनेक उपाय आहेत यामध्ये सर्वप्रथम वॉटर कॅनलचा वापर केला जातो.परंतु या आंदोलनात थेट लाठीचार्ज, पायलट गन, बिहारमध्ये एके -४७ चार वापर करण्यात आला.देशातील युवा पिढीला आपल्या हक्कांसाठी लढण्याचा संपूर्ण अधिकार संविधानाने दिलेला आहे त्या संविधानानुसार आंदोलन सुरू असतांना बळाचा वापर करण्यात आला.विद्यार्थांना आपल्या न्यायासाठी तब्बल ३५ दिवस कडवा संघर्ष करावा लागला आणि ३६ व्या दिवशी विद्यार्थ्यांना न्याय मिळाला.सरकारला सत्तेचा एवढा अहंकार चढला होता की, हे राजीनामा देणारे सरकार नाही असे घमंड त्यांच्यात निर्माण झाले होते आणि त्यांच्या मंत्र्यांनी बोलून सुध्दा दाखविले होते.अशी बतावणी करणाऱ्या भाजप नेतृत्वाला देशातील युवा शक्तीपुढे नमते घ्यावे लागले.विद्यार्थांचे आंदोलन फक्त दिल्ली पुरतेच सिमित नव्हते तर हे आंदोलन देशातील अनेक राज्यात तिव्र झाले होते. दिल्लीप्रमाणेच देशातील इतर राज्यांमध्ये सरकारने बळाचा वापर केला.

दिल्लीतील आंदोलना दरम्यान सुरक्षा विभागाने बळाचा वापर करतांना पायलट गनचा वापर केला तर, बिहारमध्ये एके ४७ चा वापर केला. म्हणजे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पांगवण्यासाठी अशा भयानक शस्त्राचा वापर करने म्हणजे सरकारची क्रूरताच म्हणावी लागेल. कारण कोणत्याही अधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय अत्याधुनिक शस्त्राचा वापर होऊच शकत नाही आणि तो आंदोलना दरम्यान झाला आहे याची कठोर चौकशी व्हायला हवी.आता प्रश्न आहे की, सरकारने सीजेपीला दिलेले संपूर्ण आश्वासन केव्हा पर्यंत पूर्ण होते.कारण सरकारने दिलेले संपूर्ण आश्वासन देशातील प्रत्येक राज्यांना लागू होते.दिल्लीसह राज्यातील अनेक भागातील विद्यार्थ्यांवर दाखल केलेले संपूर्ण फौजदारी गुन्हे मागे घेतले की नाही यात शंका कुशंका विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीट-यूजी परीक्षेची पेपरफुटी प्रकरणी जलदगती न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला कारण पेपरफुटी प्रकरणांमध्ये जलद सुनावणी व्हावी याचे मनापासून स्वागत. हा निर्णय सरकारने अगोदरच घेतला असता व धर्मेंद्र प्रधानचा राजीनामा घेतला असता तर विद्यार्थ्यांना रस्त्यावर येण्याची वेळ आली नसती हेही तितकेच सत्य आहे.सरकारने नीट-यूजी पेपर फुटीसाठी स्थापन केलेल्या फास्ट ट्रॅक कोर्टात पहिल्याच दिवशी सीबीआय वकिल गैरहजर होते त्यामुळे विद्यार्थ्यांना जलदगतीने न्याय मिळेल की नाही यातही शंका निर्माण होते.पेपरफुटी हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळला जाणारा गोरखधंदा म्हणावा लागेल आणि याचा उगम लालसेपोटी भ्रष्टाचारातुनच झालेला आहे हेही तितकेच सत्य आहे. देशात हे जे काही चालले आहे ते फक्त वाममार्गाने पैसा कमविण्यासाठी त्यामुळे आज देशात फक्त पेपरफुटीच नाही अनेक सरकारी विभाग भ्रष्टाचाराने माखलेले दिसून येतो म्हणजेच सर्वत्र फुटीच-फुटी दिसून येईल.

महाराष्ट्रात माननीय तुकाराम मुंढे यांची ज्या-ज्या क्षेत्रात आपले पाय रोवले त्या-त्या क्षेत्रातील भ्रष्टाचार उघडकीस आणला. यावरून स्पष्ट होते की देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे जाळे विणल्या गेले आहेत आणि याचे संपूर्ण धागेदोरे हे राजकीय पुढाऱ्यांच्या हातात व उच्च पदस्थ अधिकाऱ्यांच्या हातात आहे. भ्रष्टाचार करण्यामध्ये सरकारमध्ये बसलेले मोठमोठे राजकीय पुढारी व नामी अधिकारी सुद्धा सहभागी आहेत.कारण यांच्याजवळ असलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आलीच कोठून हा मोठा गहन प्रश्न आजही उपस्थित होतो.आजही जगात भारत भ्रष्टाचाराच्या बाबतीत अव्वल स्थानावर असल्याचे दिसून येते आणि पेपर फुटीचा प्रकार हा भ्रष्टाचाराचाच मोठा भाग आहे.सरकारने असे समजू नये जंतरमंतर खाली झाले म्हणून आम्ही आपल्याच पध्दतीने काम करू ही सरकारची मोठी भुल ठरेल.त्यामुळे सरकारने विद्यार्थ्यांना दिलेल्या आश्वासनांची ताबडतोब पुर्तता करावी व ही पुर्तता देशातील संपूर्ण राज्यातील आंदोलकांना लागू राहील याचीही खबरदारी सरकारने घ्यावी.सरकार म्हणते की, विद्यार्थ्यांच्या हितापेक्षा कोणतेही पद मोठे नाही. म्हणून धर्मेंद्र प्रधानचा राजीनामा दिला.

अशा पध्दतीचे लिपापोती लावणारे वक्तव्य सरकारने बंद करावे.सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की, प्रथम देश व देशाची १४५ कोटी जनता नंतर मंत्री आणि राजकारण. सरकारने लाठीचार्ज व बळाचा वापर केल्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला आणि आता सरकार मोठ्या ऐटीत सांगते की विद्यार्थ्यांच्या हितासाठी राजीनामा दिला अशा भुलथापा सरकारने मारू नये कारण जेन-झी हुशार आहे त्यांना सर्वच गोष्टी चांगल्या प्रकारे समजते.सरकारने परीक्षा व्यवस्था पारदर्शक, सुरक्षित बनविण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून टास्क फोर्सचे गठन केले यामुळे परीक्षा व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.त्याच पध्दतीने देशातील वाढत्या भ्रष्टाचाराची जळेमुळे खुप दुरवर पोहोचली आहे आणि सरकार यावर अजूनपर्यंत नियंत्रण ठेवू शकली नाही म्हणूनच पेपर फुटी झाली.कारण यात मोठ्या प्रमाणात आजी माजी आमदार-खासदार, मंत्री व राजकीय पुढारी लिप्त आहेत.

यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून टास्क फोर्सचे ताबडतोब गठन करून भ्रष्टाचाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे आणि पेपर फुटीसारख्या प्रकरणावर आळा घातला पाहिजे.जय

- ९९२१६९०७७९

# चांगल्या माणसाशीच मैत्री करावी!

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

आंतरराष्ट्रीय मैत्री दिन सर्व संस्कृतींमध्ये मैत्रीची भूमिका बजावण्याचा प्रयत्न करतो. हा विशेष दिवस साजरा करण्यासाठी, संयुक्त राष्ट्र समुदाय गट, संस्था आणि सरकारांना सलोखा, परस्पर समंजसपणा आणि एकता यांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रोत्साहित करते. युनायटेड नेशन्स जनरल असेंब्ली (यूएन.) द्वारे आंतरराष्ट्रीय मैत्री दिन 30 जुलै नियुक्त केला गेला. सर्व समुदाय आणि संस्थांना आम्ही आमच्या जवळ असलेल्या मैत्रीचा उत्सव साजरा करणाऱ्या कार्यक्रमांचे समन्वय साधण्यासाठी प्रोत्साहित करते. बऱ्याच इव्हेंटमध्ये सलोखा निर्माण करणे, समजूतदारपणा आणि सहमती निर्माण करणे आणि घरासारखे वाटत असलेल्या मैत्रीमध्ये सांत्वन मिळवणे यावर लक्ष केंद्रित केले जाते.

मित्र-मैत्रिणी एकमेकांना भेटणं या इतकी आनंदाची गोष्ट दुसरी कोणतीच नसेल. आपल्या आयुष्यात वेगवेगळ्या वळणावर भेटणाऱ्या व्यक्ती त्यातील काहींशी आपली मैत्री अगदी दृढ होते. पण या प्रत्येक वळणावरील मैत्रीचे कंट्रिब्यूशन आपल्या जीवनात खूप मोलाचे असते. ते आपण कधीच विसरू नये. लहानपणी शाळेतील मित्र-मैत्रिणी अढी-अबोला अधिक काळ ठेवत नाहीत. किती निरागस असते नाही, ही मैत्री! मुलं-मुली एकत्र आनंदाने खेळतात, रुसतात, फुगतात, पुन्हा भांडण विसरून जातात. लगेचच कट्टीची गट्टी होते. पुढे तारुण्यातील मैत्री ही काही वेगळीच! या वयात



ज्यांच्याशी आपल्या विचारांची तार जुळते त्यांच्याशीच मैत्री होते. तारुण्यातल्या मैत्रीत खूप मजा असते, आपण तारुण्यात कोणाची कदर करत नसतो कारण या वयातील मैत्री तशी थोडी वरवरचीच असते. टिकली तर टिकली, नाहीतर फेकली वरचे वर!. आपण आपल्या विश्वात रमून जातो. आपलं विश्व त्यावेळी डबक्या सारखं असतं. विशाल सागराचा आपण त्या वेळी विचारच केलेला नसतो, पण जेव्हा पन्नाशीत पोहोचतो तेव्हा कधी डबकं सोडून सागराला मिळालेले असतो हे कळतसुद्धा नाही. जेव्हा पन्नाशीच्या सागरात मित्र-मैत्रिणी भेटतात तेव्हा सगळ्या नात्यात ते मैत्रीचं नातं इतकं आपलंसं वाटत असतं कि ती मैत्री खूप हवीहवीशी वाटते.

नात्यापेक्षा मैत्रीचा आधार खूप हवासा वाटतो. मैत्रीत खूप मोकळेपणा असतो. आपली विचारांची तार जुळत असेल तर काहीही आडपडदा न ठेवता आपण मित्र-मैत्रिणींशी सर्वकाही शेअर करतो. जो आपल्याला समजून घेतो व आपल्या हाकेला ओ देतो तोच खरा मित्र समजतो. आयुष्याच्या संध्याकाळी सुद्धा असे मित्र मैत्रिणी भेटतात. आपण कोणीच कोणाचे नसतो. पण आपले काहीतरी ऋणानुबंध असतात, म्हणूनच आपली भेट त्या व्यक्तीशी होते. कविता साक्षी आहे- "ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी!"

स्त्री-पुरुष मैत्री ही आणखी एक निराळीच गोष्ट आहे. ही समाजाला बोचते. भिन्नलिंगी मैत्री ही दूषितच असते, असं समजलं जातं. एखाद्याचे तसे असेलहि. पण म्हणून सब घोडे बारा टक्के या चालीवर हे समजू नये. कितीतरी अशा व्यक्ती आहेत की ज्या निखळ सच्ची मैत्री करतात. त्यांना ही मैत्री आनंद देते. हे मैत्रीचे नाते लगेचच प्रेमसंबंधाशी जोडू नये. हा मनाचा कोतेपणा आहे. मुद्दाम कोणी अशी मैत्री शोधायला जात नाही. काही वेळा ती सहजच घडते. काही माणसं थोड्या सहवासानेहि आपलीशी वाटतात. आपण त्यांच्या स्वभावाच्या प्रेमात पडतो, त्यांचा सहवास हवाहवासा वाटतो. ज्यांना अशा व्यक्ती भेटतील तर त्या त्यांनी अवश्य जपाव्यात. सगळ्यांनाच हे भाग्य लाभत नाही. जीवन आनंदी होण्यासाठी मैत्री कारणीभूत ठरते, अशी ही मैत्री आहे. मोगऱ्याच्या फुलाचा सुगंध आपल्याला हवा हवासा वाटतो. तो लपवता येत नाही. त्याचा आपण आस्वाद मनमुराद लुटतो. तसच मैत्रीचं आहे. निकोप मनाने स्वतःवर व दुसऱ्या व्यक्तीवर विश्वास ठेवून ही मैत्री जपली पाहिजे. आपल्यापेक्षा आपण दुसऱ्या व्यक्तीची जेव्हा अधिक काळजी घेतो तीच खरी मैत्री! त्यात जरासुद्धा स्वार्थीपणा नसतो, अपेक्षांचे ओझे नसते, गैरसमजाला थारा नसतो. मला वाटतं नवरा-बायको सुद्धा चांगले मित्र-मैत्रिण बनू शकतात. जेव्हा त्यांच्यातलं आकर्षण संपतं तेव्हा जर त्यांना "लव्ह एण्ड अफ्फेक्शन" याचा खरा अर्थ समजेल तेव्हाच आणि त्यांच्या जीवनात तो अर्थ उतरलेला असेल तेव्हाच! नाही तर खूप वेळा ते नातं कोरडं पडलेलं असतं. हल्लीच्या झगमगाटी दुनियेत समईचं शांत तेवणं मनाला अधिक प्रसन्नता देतं, तसंच मैत्रीचं आहे!

स्वामी विवेकानंदांनी मैत्री साहचर्य यावर एक सुंदर भाष्य केले आहे. ते म्हणतात, "पावसाचा थेंब आकाशातून पडतो, जर तो हातावर घेतला तर ते पाणी पिण्यासाठी शुद्ध असते. पण जर तो थेंब गटारीत पडला तर तो पाय धुण्यासाठी ही उपयोगी नसतो! जर तो थेंब कमळाच्या पानावर पडला तर तो मोत्याप्रमाणे चमकतो व तो जर शिंपल्यात पडला तर तो मोतीच बनतो! थेंब एकच पण त्याचे मूल्य त्याचं असणं कुणा बरोबर आहे यावर ठरतं! म्हणून चांगल्या माणसाची मैत्री करा, जे हृदयाने चांगले आहेत." म्हणून तर आपली एखाद्याशी घट्ट मैत्री होते कारण त्याचे व आपले मन जुळलेले असते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

- ९६९९८३६७१७

# गुरुपौर्णिमा श्रद्धा, ज्ञान आणि संस्कारांचा उत्सव

प्रतिभा पिटके
अमरावती

"गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुदेवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥"

भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थान अत्यंत श्रेष्ठ मानले गेले आहे. गुरु केवळ शिक्षण देत नाही, तर अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारा जीवन मार्गदर्शक असतो. आषाढ महिन्यातील पौर्णिमेला साजरा होणारा गुरुपौर्णिमा हा सण गुरुंबद्दल आदर, श्रद्धा आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा पवित्र दिवस आहे. म्हणूनच हा दिवस श्रद्धा, ज्ञान आणि संस्कारांचा उत्सव म्हणून ओळखला जातो. भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थान अत्यंत श्रेष्ठ मानले जाते वेद पुराणे महाभारत या सगळ्या ग्रंथात हेच सांगितले आहे. आपण भारतीय महर्षी वेदव्यासांना आद्यगुरू मानतो, आज महर्षी वेदव्यासांची जयंती असल्याने ह्या दिवसाला व्यासपौर्णिमा म्हणतात.

मनुष्याचा पहिला गुरू म्हणजे जन्मदात्री आई! अनेक संतांनी कवींनी आईचे महत्व विशद केलेले आहे. आई माझा गुरू,आई कल्पतरू असे म्हटले जाते ते किती योग्य आहे याचाही आपल्याला अनुभव आहेच. मुलाच्या जीवनाला वळण लावण्याचे काम आई वडील करतात, तर गुरू ज्ञान देऊन व्यक्तिमत्व घडवतात. शिस्त प्रामाणिकपणा व आत्मविश्वास निर्माण करतात यशाचा मार्ग दाखवितात आजच्या आधुनिक, तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानाची अनेक साधने उपलब्ध असली तरी गुरुचे महत्व कमी होत नाही पूर्वीच्या काळी गुरुकुल पद्धती होती शिष्य गुरुघरी राहत असत. त्यांची सेवा करीत. भारतीय परंपरेत अनेक गुरू शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत कृष्ण सांदीपनी, श्रीराम वशिष्ठ, अर्जुन द्रोणाचार्य या गुरुशिष्याच्या जोड्याची आपल्याला अजूनही आठवण आहे.

गुरू म्हणजे फक्त अक्षरओळख करून देणारा किंवा पुस्तकी ज्ञान देणारा वाटाड्या नाही. शिष्याने कसे राहावे, जीवन आदर्श कसे बनवावे, हे आपल्या आचरणाने सांगणारा मार्गदर्शक असतो. आयुष्याच्या वाटेवर भेटणारी प्रत्येक व्यक्ती गुरुच असते असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही. कुणी व्यक्ती आपल्याला आपुलकी, प्रेम तडजोड जीवनाकडे,पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन शिकविते, तर कुणी दुःखात ही कसं खंबीर राहावे हे शिकवित असते. वयाने लहान असो किंवा मोठा प्रत्येक व्यक्तीकडे काही तरी शिकण्यासारखे असतेच. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर भेटलेली प्रत्येक व्यक्ती एक प्रकारे गुरुच असते आपली! त्यांच्यामुळेच आपले जीवन समृद्ध होत असते.

गुरुपौर्णिमा हा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक सण नसून गुरुबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा व त्यांच्या शिकवणीप्रमाणे आदर्श जीवन जगण्याचा प्रेरणादायी दिवस आहे गुरुच्या ज्ञानामुळेच व्यक्ती , समाज व राष्ट्राची प्रगती होत असते म्हणून प्रत्येकाच्या मनात आदराची दृष्टी ठेवली पाहिजे. गुरू आत्म्याला परमेश्वराशी जोडण्याचे काम करतात, आपण त्यांचे उपकार कधीही फेडू शकत नाही एकलव्याने आपल्या उजव्या हाताचा अंगठा गुरुदक्षिणेत द्रोणाचार्यांना दिला होता, ही कथा आपल्याला माहीत आहे संत कबीर गुरुमहिमा सांगतांना म्हणतात--

गुरू गोविंद दोऊ खडे, काके लागू पाय?
बलिहारी गुरू आपने, गोविंद दियो बतायअर्थात
गुरुचे स्थान परमेश्वरापेक्षाही मोठे आहे.
तुकडोजी महाराज म्हणतात
गुरुविणा उद्धार नाही कुणाचा

- ९४२१८२८४१३